सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ६ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पीओके परत मिळाल्यावर शांतता नांदेल परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६लंडन**

'जयशंकर पीओकेवर बोलताना'जम्मू-काश्मीरचा पाकिस्तानने बळकावलेला भूभाग पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी आम्ही प्रतीक्षा करतोय. पीओके भारतात विलिन होताच जम्मू-काश्मीरमध्ये पूर्ण शांतता प्रस्थापित होईल असे वक्तव्य परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केले आहे. जयशंकर सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून लंडनमधील चॅथम हाऊस थिंक टँकमध्ये जगात भारताचा उदय आणि भूमिका या विषयावर परराष्ट्रमंत्री बोलत होते.



एस. जयशंकर यांनी काश्मीर आणि केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल भाष्य केले. त्यात कलम ३७० हटवणे, आर्थिक उपाययोजना आणि मतदानात लोकांचा सहभाग वाढवणे आदी मुद्यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत डॉलरच्या वापराबद्दल ब्रिक्स देशांच्या मतांवरही त्यांनी यावेळी चर्चा केली. जम्मू-काश्मीर संदर्भात 'जयशंकर झजघ वर बोलताना 'म्हणाले की, काश्मीरमधील बहुतांश समस्या सोडवण्याचे चांगले काम आम्ही केले आहे. मला वाटते की कलम ३७० हटवणे हे एक पहिले पाऊल होते. त्यानंतर, काश्मीरमध्ये विकास, आर्थिक उलाढाल आणि सामाजिक न्याय पुर्नस्थापित करणे हे दुसरे पाऊल होते. निवडणुकांमधील मतदानात लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवणे हे तिसरे पाऊल होते. आता आम्ही पाकिस्तानने बळकावलेला जम्मू-काश्मीरचा भाग परत मिळण्याची वाट पाहत आहोत. पाकव्याप्त काश्मीर परत मिळवल्यानंतर काश्मीरचा मुद्दा सुटेल असा विश्वास जयशंकर यांनी व्यक्त केला.

जयशंकर पुढे म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेतील प्रशासन बहुध्रुवीयतेकडे वाटचाल करत आहे. जे भारताच्या हिताशी सुसंगत असे आहे. दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार कराराच्या आवश्यकतेवर सहमती दर्शविली आहे.

आयात शुल्काबाबत (टॅरिफ) जयशंकर म्हणाले की, गेल्या महिन्यात व्हाईट हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली होती. यानंतर आता वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल द्विपक्षीय व्यापार करारावर चर्चा करण्यासाठी वॉशिंग्टनमध्ये आहेत. आम्ही शुल्काबाबत (टॅरिफ) खुली चर्चा केली. त्या चर्चेनंतर द्विपक्षीय व्यापार कराराच्या आवश्यकतेवर सहमतील झाल्याचे जयशंकर यांनी सांगितले.

## मुंबईची भाषा मराठी याबाबत दुमत नाही, माझ्या विधानामुळे : भय्याजी जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

घाटकोपरची भाषा गुजराती असून मुंबईतील प्रत्येकाला मराठी भाषा बोलता आलीच पाहिजे असं नाही, असे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भय्याजी जोशी यांनी काल मुंबईतील एका कार्यक्रमात केले. त्यांच्या या विधानाने वाद निर्माण झाला. वादाचे पडसाद सर्वत्र उमटल्यावर भय्याजी जोशी यांनी त्यावर खुलासा केला.

मी केलेल्या एका विधानामुळे गैरसमज झाला आहे असं मला वाटतंय. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे आणि मुंबई हा महाराष्ट्राचाच भाग आहे, त्यामुळे मुंबईची भाषा मराठी याबाबत दुमत असल्याचं काहीही कारण नाही. भारताची एक विशेषत: आहे की येथे विविध भाषा बोलणारे लोक परस्परांना सोबत घेऊन चालतात. त्यांच्यात भाषेमुळे प्रश्न निर्माण होत नाही. म्हणूनच भारत देश हे जगासमोर आदर्श



उदाहरण आहे. मुंबईतही बहुभाषिक लोक आहेत आणि ते परस्परांवर स्नेहसंबंध ठेवूनच मुंबईचं जीवन चालतंय. स्वाभाविकपणाने आमची सर्वांची अपेक्षा असते की बाहेरून येणाऱ्यांनी त्यांच्या भाषेसह मराठी भाषाही शिकावी, त्याचं अध्ययन करावं. मराठी भाषा ही सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध भाषा आहे. ती अनेकांनी अभ्यासावी असंच आम्हाला वाटतं. माझ्या वक्तव्यावर जे राजकारण सुरु आहे त्यावर मी बोलू इच्छित नाही, तो माझा विषय नाही.

भय्याजी जोशी यांचे वक्तव्य मी ऐकलेलं नाही. त्यामुळे ते ऐकून मी त्याच्यावर माहिती घेऊन मी बोलेन. याच्यावर सरकारची भूमिका पक्की आहे. मुंबईची, महाराष्ट्राची, महाराष्ट्र शासनाची भाषा मराठी आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकलं पाहिजे. प्रत्येकाला मराठी बोलता आलं पाहिजे. माझ्या वक्तव्याबाबत भय्याजी जोशी यांचेही काही दुमत असेल असं मला वाटत नाही. तरीही मी शासनाच्या वतीने सांगतो की, मुंबईची, महाराष्ट्राची भाषा मराठी आहे. इतर भाषांचा इथे सन्मान आहे. कुठल्याही भाषेचा आम्ही अपमान करणार नाही. कारण जो स्वतःच्या भाषेवर प्रेम करतो तोच दुसऱ्याच्या भाषेवरही प्रेम करु शकतो. त्यामुळे तो सन्मान आहेच. म्हणून शासनाची भूमिका पक्की आहे आणि शासनाची भूमिका मराठी आहे, असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात या मुद्द्यावर बोलताना दिले.

## 'एससीईआरटी' चा मोठा निर्णय, राज्यात पहिली ते नववीच्या परीक्षा एकाच वेळी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद म्हणजेच एससीईआरटीने मोठा निर्णय घेत राज्यातील सर्व सरकारी आणि खासगी शाळांना एकच वेळापत्रकाची घोषणा केली आहे. यानुसार आता पहिली ते नववीच्या सरकारी आणि खाजगी शाळांना एकच वेळापत्रक असणार आहे. या वेळापत्रकानुसार, राज्यातील सर्व शाळांमध्ये पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा एकाच वेळी आयोजित करण्यात येणार आहे.

एससीईआरटीने दिलेल्या माहितीनुसार, आता पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा ८ ते २५ एप्रिल दरम्यान होणार आहे तर १ मे रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. तर २ मे पासून शाळांना उन्हाळाच्या सुट्ट्या लागणार आहे. राज्यात शैक्षणिक वर्ष ३० एप्रिलपर्यंत सुरु असते मात्र अनेक शाळांमध्ये एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात किंवा दुसऱ्या आठवड्यात परीक्षा आयोजित करण्यात येते. त्यानंतर ३० एप्रिलपर्यंतचे शैक्षणिक दिवस वाया जातात. याबाबत विचार करुन एससीईआरटीने राज्यातील सर्व शाळांना एकच वेळापत्रक लागू

### शिक्षक संघटनांचा विरोध



करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता नवीन वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा ८ एप्रिलपासून २५ एप्रिलपर्यंत आयोजित करण्यात येणार आणि निकाल १ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. याचबरोबर २ मे पासून उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागणार आहे.तसेच पुढील शैक्षणिक वर्षात जून महिन्यात याची कल्पना देऊन हा निर्णय लागू करणे आवश्यक होते याबाबत आम्ही निवेदन देणार असल्याची माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.

तर दुसरीकडे एससीईआरटीने घेतलेल्या या निर्णयाला मुख्याध्यापक, शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे. तसेच सूट्यांचे नियोजन बिघडणार असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून येत आहे. अचानक बदल करण्यात आल्याने शाळांचे नियोजन कोलमडणार असल्याचे मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील यांनी सांगितले आहे.

## मोहित कंबोजशिवाय जलसंपदा विभागाचं पानही हलत नाही; विधान परिषदेत दानवेंचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

राज्यातील जलसंपदा विभागात मोहित कंबोज यांच्याशिवाय पानही हलत नाही. जलसंपदाचा विभागाचा कुठलाही निर्णय मोहित कंबोज यांना विचारल्याशिवाय होत नाही असा गंभीर आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला. यावेळी भाजपा आमदार प्रसाद लाड आणि दानवे यांच्यात वाद झाला, तेव्हा मोहित कंबोज तुमचे जावई आहेत का असा सवाल दानवेंनी विचारला.

विधान परिषदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षनेते




अंबादास दानवे यांनी राज्यातील जलसंपदा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दानवे म्हणाले की, आज जलसंपदा विभागात एखाद्या अधिकाऱ्याला फोन केला तर निर्णय मोहित कंबोज घेतो. दीपक कपूर नावाचे अधिकारी मोहित कंबोजला विचारल्याशिवाय पाणीही पित नाहीत. मंत्र्यांना माहिती आहे की नाही ठाऊक नाही, परंतु मोहित कंबोज यांना विचारल्याशिवाय जलसंपदा विभागात पानसुद्धा हलत नाही अशी स्थिती आहे असा आरोप त्यांनी केला.

तसेच हा मोहित कंबोज कोण आहे, ग्रामीण भागातील मोठमोठ्या धरणाचे प्रश्न, पाटबंधारे, पाण्याचा प्रश्न असतील त्याचे निर्णय मोहित कंबोज घेतो. याची चौकशी व्हायला हवी. मी पुरावे देईन, मोहित कंबोज जलसंपदा विभाग चालवतात. मोहित कंबोज आणि दीपक कपूर यांचे संभाषण तपासा, सीडीआर तपासा. कंबोज यांना सांगितल्याशिवाय महाराष्ट्रातील कुठले निर्णय होत नाहीत. माझा बोलण्याचा अधिकार आहे. कुठल्याही मंत्र्यांवर माझा आरोप नाही. मी त्या विभागाच्या कारभारावर बोललो आहे. या प्रकाराची चौकशी सरकारने करावी अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली.

दरम्यान, मी बोलतोय जे जबाबदारीने बोलतोय. कोणकोणत्या कामात मोहित कंबोजने काय केले हे सांगू का, फार पुढे गेले तर सगळ्या गोष्टी लफडं होईल. एखादे मंत्री, अधिकारी बोलतात हे समजू शकतो, पण मोहित कंबोज कोण आहे? त्याचा संबंध काय, माझ्या भाषणावर आक्षेप घेण्याचं कारण नाही असंही अंबादास दानवे यांनी म्हटलं.

## आजोबांना विचारा आम्हाला शिकवू नका; नितेश राणे-रोहित पवार यांच्यात शाब्दिक चकमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्या राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्यावरील कारवाईच्या मुद्द्यावरून विधानसभेत मंत्री नितेश राणे आणि शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यात शाब्दिक चकमक झडली.

राज्यपालांच्या अभीभाषणाच्या चर्चेत बोलताना रोहित पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणारा कोरटकर एवढा मोठा कधी झाला?, सरकार त्याच्या घराला सुरक्षा देते. तो मध्य प्रदेशात पळून जातो. राहुल सोलापूरकरवरही सरकारने कारवाई केली नाही, उलट पुणे महापालिकेत पदावर घेऊन बक्षीस दिले. सीबीआय, ईडीने मोतेवार यांच्या जप्त केलेल्या गाड्या कोरटकर वापरतो. यावर आता सीबीआयने कारवाई केली.



दिल्लीत बसून सीबीआय कारवाई करते, मात्र आपले सरकार कारवाई करत नाही, रोहित पवार असे म्हणताच मंत्री नितेश राणे यांनी याला आक्षेप घेतला. याप्रकरणी सरकारकडून कोरटकर आणि सोलापूरकर या दोघांवरही कारवाई सुरू असून, पवार हे सभागृहात चुकीची माहिती देत असल्याचे नितेश राणे म्हणाले.महाराजांना जाणता राजा बोलू नका, हे कोण म्हणाले होते, हे आपल्या आजोबांना जाऊन विचारा, औरंग्या होता म्हणून शिवाजी महाराज झाले, असे जितेंद्र आव्हाड बोलतात, यांचा राहुल गांधी जयंतीच्या दिवशी महाराजांना श्रद्धांजली वाहतो आणि हे आम्हाला शिकवणार का? असा सवाल नितेश राणे यांनी केला. त्यावर कोरटकर, सोलापूरकर वर कारवाई झालीच पाहिजे, असे म्हणत तुमच्या घरापर्यंत जात नाही, माझ्या आजोबांबद्दल काय बोलताय, असा सवाल रोहित पवार यांनी राणे यांना विचारला. आता या शाब्दिक चकमकीवरून आणखी काय घडामोडी घडतात, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

## सतीश भोसलेला मी ओळखतो, पण तो पाठीमागे...; सुरेश धस 'खोक्या'बाबत स्पष्टच बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

बीडमधील मस्साजोग दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडच्या शिरुरमधील एक संतापजनक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश भोसले एका व्यक्तीला बेदम मारहाण करताना दिसत आहे. ज्यानंतर मोठी खळबळ निर्माण झाली आहे. यासोबतच सतीश भोसले याचा अजून एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. यात तो त्याच्या कारमध्ये नोटांचे बंडल फेकत असल्याचं दिसत आहे. या व्हायरल होणाऱ्या व्हिडिओनंतर जोरदार टीका केली जात आहे. यावर सुरेश धस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

सुरेश धस हे म्हणाले की, सतीश भोसले



याला मी ओळखतो. तो कधी कधी माझ्याकडे येतो. पण तो पाठीमागे असे काही उद्योग करतो हे थोडीच मला माहिती आहे. शंभर टक्के त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. मी अगोदर हे सांगू इच्छितो की, हा व्हायरल होणारा व्हिडीओ आताचा नाही तर दीड वर्षे जुना आहे. तो बॉस समजतो म्हणून काय झाले. मीच बॉस म्हणून सांगतो त्याच्याविरोधात कारवाई झाली पाहिजे. महिलेच्या छेडीवरून ही घटना घडल्याची माहिती मिळाल्याचे सुरेश धस यांनी यावेळी म्हटलं आहे.सतीश भोसले याच्याविरोधात आता गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळाली आहे. व्हिडीओमध्ये मारहाण करणारा सतीश भोसले हा सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याने त्यांच्यावर जोरदार टीका होताना दिसत आहे. आता यावर स्पष्ट भूमिका ही सुरेश धस यांनी घेतली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सतीश भोसले याचा गाडीतील व्हिडीओ हा सोशल मीडियावर शेअर केला. हा व्हिडीओ शेअर करत काही प्रश्नही उपस्थित केले.

## ...अन् मराठी माणूस हे वाक्य विसरणार नाही; राज ठाकरे संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

सध्या सोशल मीडियावर आरएसएसच्या भय्याजी जोशी यांचे मराठी भाषे विषयीचे विधान चर्चेत आले आहे. त्यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळातून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मुंबईतील प्रत्येकाला मराठी भाषा बोलता आली पाहिजे असं नाही असं वक्तव्य भय्याजी जोशी यांनी केले होते, यावर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे यांनी भय्याजी जोशी यांच्या



विधानाचा निषेध केला आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ट्विटरवर पोस्ट करुन भय्याजी जोशी यांच्यावर संताप व्यक्त केला आहे. राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की,देशाची झालेली भाषावार प्रांत रचना, त्यात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून १०६ हुतात्म्यांनी दिलेलं बलिदान या सगळ्याबद्दल भय्याजी जोशींना माहीत नसेल असं अजिबात नाही. पण कायम महाराष्ट्राबद्दलच किंवा मराठीबद्दलची अशी विधाने करायची याचं कारण काय ?, असा सवालही केला आहे. 'भय्याजी जोशींनी असंच विधान बेंगळुरू किंवा चेन्नईत करून दाखवावं.... आणि भय्याजी जोशींच्या या विधानाशी महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्ष सहमत आहे का ?, असंही राज ठाकरे म्हणाले.

## संपादकीय ......

# औरंगजेबाचा इतका पुळका कशासाठी?

मराठी माणूस नाही, तर हिंदुस्थानातील प्रत्येक हिंदूंनी मनामनात आजही छत्रपती शिवाजी महाराज हे शब्द उच्चारले तरी, रक्त सळसळते. औरंगजेबाच्या जुलमी साम्राज्याविरुद्ध रयतेचे 'स्वराज्य' निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्याबद्दल महाराष्ट्राच्या भूमीत साडेतीनशे वर्षांनंतर तोच नितांत आदर आजही कायम आहे. तरीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यावर आक्रमण करून आलेल्या औरंगजेबाचा पुळका आजही काही लोकांना येतो आहे, याचे आश्चर्य वाटते. छावा चित्रपटामुळे औरंगजेबाची क्रूरता पुन्हा एकदा नव्या पिढीला दिसली. छत्रपती संभाजी महाराजांना फसवून बंदी बनवून ४० दिवस ठेवले आणि त्यांचे हाल हाल करून त्यांना मारले, पण संभाजी महाराजांनी मृत्यूला कवटाळताना ना हिंदू धर्माचा त्याग केला ना त्याला शरण आले. गवताला भाले फुटतात, तसे लाखो मुगल सैनिकांविरुद्ध मराठा मावळ्यांनी २७ वर्षे संघर्ष केला; परंतु मराठा साम्राज्यांचा भगवा झेडा कायम फडकत ठेवला. त्यामुळे आज मराठी मातीत जन्माला आलेल्या मुलाला त्याचे आई-वडील छत्रपती शिवाजी महाराज हेच आपले दैवत आहेत, असे संस्कार देतात.

महाराष्ट्र सरकारच्या स्थापनेपासून सर्व राजकारण्यांना शिवाजी महाराजांच्या आदर्शाचा कित्ता गिरविल्याशिवाय त्यांना मान मिळणार नाही, याची कल्पना आली आहे. असे असताना, समाजवादी पार्टीचे ज्येष्ठ आमदार अबू असीम आझमी यांना औरंगजेबाचा इतका पुळका कशासाठी आला हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडल्याशिवाय राहणार नाही. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना, आमदार आझमी यांनी औरंगजेबाबद्दल व्यक्त केलेल्या प्रेमाचा निषेध सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या मंडळींकडून केला जात आहे ही जमेची बाजू असली तरी, आझमी यांना प्रवाहाच्या विरोधात जाऊन औरंगजेबाला हिरो ठरविण्याचा केलेला खटाटोप कशासाठी केला असेल याची उत्तरे त्यांनीच दिलेली बरी.

आता या आझमीने काय मुक्ताफळे उधळली ते पाहू. म्हणे, 'औरंगजेब हा क्रूर नव्हता, तर उत्तम प्रशासक होता, त्याच्या काळात भारताची जीडीपी सर्वात जास्त होती. देशात सध्या औरंगजेबाची प्रतिमा चुकीच्या पद्धतीने रंगवली जात आहे.' असे आझमीने माध्यमांसमोर सांगितले. एवढेच नव्हे, तर समाजवादी पार्टीच्या प्रवक्त्यांकडून औरंगजेब यांच्या राजवटीत भारताची सीमा ही अफगाणिस्तान आणि बर्मा देशापर्यंत पोहोचली होती.त्याच्या काळात भारताला सोने की चिडीयाँ म्हणायचे, अशी बाजू मांडण्याचा प्रयत्न माध्यमातून केला. याचा अर्थ ही केवळ एकट्या आझमीची भूमिका नाही, तर एका विशिष्ट विचारधारेवर चालणाऱ्या पक्षाची भूमिका असेल, तर फारच गंभीर आहे. ज्याने संभाजीराजांना हाल करून मारले, हिंदूंची मंदिरे तोडली असा औरंगजेब हा चांगला शासक कसा असू शकतो? असा सवाल आता शिवप्रेमी विचारत आहेत.

औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्या आझमीसारख्या महाराष्ट्र द्रोह्यांनी, औरंगजेबांचे निर्दयी रूप पुन्हा एकदा अभ्यासावे. मुघल सत्ता प्राप्त करण्यासाठी औरंगजेबाने स्वत:च्या सख्ख्या भावांची हत्या केली होती. वडील शाहजहानला कैदेत ठेवले होते. आपला मुलगा आपल्याला धोकादायक ठरू शकतो, हे लक्षात आल्यानंतर औरंगजेबाने त्यालाही सोडले नाही. दारा शिकोहला हटवून स्वतः सत्ता हस्तगत केली. दारासह कुटुंबातील २७ जणांची हत्या करणारा औरंगजेब जर यांना क्रुरकर्मा दिसत नसेल, तर आझमीचे डोळे तपासून घ्यायला हवेत.

खरे तर, अबू आझमीसारख्या माणसाकडून चांगले बोलण्याची काय अपेक्षा करणार. मुंबईत १९९३ साली बॉम्बस्फोट मालिकेत हजारो निरपराध नागरिकांना जीव गमावावा लागला होता. मुगलाचा वारसा सांगणाऱ्या पाकिस्तानच्या इशाऱ्यावरून हा बॉम्बस्फोट घडवून आणला होता, हे कोर्टाच्या रेकॉर्डवर आहे. त्या बॉम्बस्फोट मालिकेतील एक संशयित आरोपी म्हणून आझमीचे नाव होते. पुराव्याअभावी तो सुटला तरी, त्याचे अशा समाजविघातक प्रवृत्तीशी संबंध होते, ही गोष्ट कोणीही नाकारू शकत नाही. त्यामुळे आझमीने अकलेचे तारे तोडले. त्याला जमिनीवर आणण्याची गरज आहे.म्हणे औरंगजेबाने त्याच्या ४९ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये मुघल साम्राज्याच्या सीमांचा विस्तार केला. त्याने हिंदू-मुस्लीम असा भेद कधीच केला नाही, असे आझमीचे म्हणणे आहे. इतिहासात हजारो हिंदू मंदिरे नष्ट केल्याचे पुरावे सापडतील; परंतु औरंगजेबाने एक तरी मशीद पाडल्याचा पुरावा दाखवावा, असे आझमीला सांगावे लागेल. आता झाले ते पुरे झाले. यापुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या कोणाचीही गय करता कामा नये. एवढेच नव्हे, तर औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्या अबू आझमीसारख्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, ही मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सत्ताधारी पक्षातील अनेक आमदारांनाही केली आहे, तर त्यावर त्वरित सरकारने कारवाई केली पाहिजे.

औरंगजेब म्हणजे क्रुरकर्माच होताच. तरीही महाराष्ट्रात अचानक औरंग्याच्या एवढ्या अवलादी आल्या कुठून, हा प्रश्न आहे. औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात यापुढे कोणी करता कामा नये यासाठी आझमीविरोधात सरकारने ठोस कारवाई करायला हवी.

महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेच्या मनात बिंबलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला तडा देण्याचा प्रयत्न औरंगीवृत्ती करत असेल, तर त्याला वेळीच ठेचण्याचे काम केले पाहिजे. नाही तर महाराष्ट्राचे अस्वस्थ मन जुलमी मुघलांच्या पिळावलीला मातीत गाडण्यासाठी पुन्हा संघर्षाच्या पावित्र्यात जाईल. ती वेळ राज्यकर्त्यांनी आणू नये. उद्या दुसरा कोणीही आझमी तोंड वर करून बोलण्याची हिंमत करणार नाही, याची काळजी सरकारने घ्यावी.

# समाजकल्याणच्या २१९ पदांसाठी १ लाख ८७ हजार उमेदवार

## राज्यात ५६ केंद्रावर दररोज २२ हजार उमेदवारांची ऑनलाइन परीक्षा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** समाजकल्याण आयुक्तालयातील वर्ग-३ संवर्गातील २१९ विविध पदांसाठी १ लाख ८७ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत. यासाठी राज्यातील ५६ केंद्रांवर ४ मार्चपासून ऑनलाइन परीक्षा सुरू झाली असून, १९ मार्चपर्यंत चालणार आहे. दरम्यान, ऑनलाइन परीक्षेसाठी काही परीक्षा केंद्रांवर उमेदवार वेळेवर पोहोचत नसल्याचे दिसून आले आहे, तसेच उशिराने आलेले अर्जदारांनी परीक्षा केंद्रावर प्रवेश मिळावा म्हणून कर्मचाऱ्यांशी हुज्जत घातली आहे. त्यामुळे परीक्षा कामकाजात व्यत्यय येऊ नये यासाठी उमेदवारांनी निर्धारित वेळेतच केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे.



ही संगणक आधारित परीक्षा असून, ३ सत्रांमध्ये ती आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील ५६ केंद्रांवर दररोज साधारणपणे २२ हजार उमेदवार परीक्षेस सामोरे जात आहेत. त्यामध्ये वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षकांच्या ५ जागांसाठी ११ हजार २१६ अर्ज, गृहपाल, अधीक्षक-६१ जागांसाठी ४० हजार ९६८, गृहपाल, अधीक्षक (महिला) ९२ जागांसाठी ७३ हजार ६२५, समाजकल्याण निरीक्षक ३९ जागांसाठी ५८ हजार ९, उच्च श्रेणी लघुलेखक १० जागांसाठी १ हजार ३१७, निम्न श्रेणी लघुलेखक ३ जागांसाठी ६२० व लघु टंकलेखक ९ जागांसाठी १ हजार ४४७, असे एकूण २१९ जागांसाठी १८७२०२ उमेदवारांचे अर्ज आले आहेत. त्यामध्ये ९९ हजार ५०८ महिला अर्जदार असून, ८७ हजार ६५८ पुरुष अर्जदार आहेत, तर ३ हजार ४४८ माजी सैनिक आहेत. दिव्यांग उमेदवाराने स्वत:चा लेखनिक उपलब्ध करावा. समाजकल्याण विभागाकडून लेखनिक उपलब्ध करून दिला जाणार नसल्याचे विभागाने कळविले आहे.

# भाजीपाला पिकास आधार देण्याची मंडप पद्धत आहे तरी काय? वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक –** वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार देण्यासाठी मंडप पद्धत किंवा ताटी पद्धत वापरली जाते. या पद्धतीमुळे पिकांची वाढ चांगली होते आणि दर्जेदार उत्पादन मिळते. ही पद्धत कशी वापरली जाते, या पद्धतीचे फायदे काय आहेत? जाणून घेऊया या लेखातून....

**भाजीपाला पिकास आधार देण्याची मंडप पद्धत**

मंडपाची उभारणी करताना शेताच्या सर्वबाजूंनी प्रत्येक ५-६ फूट अंतरावर १० फूट ऊंच, ४ जाड लाकडी डांब शेताच्या बाहेरील बाजूने झुकतील अशा रीतीने २ फूट जमिनीत गाडावेत.

प्रत्येक सरीच्या दर १० फुटांवर १० फूट ऊंच, ३० जाड डांब जमिनीत २ फूट गाडावेत.

म्हणजे शेतात १०x१० चौ. फुटांवर लाकडी बल्या उभ्या राहतील.

प्रत्येक डांबाच्या बाहेरील बाजूने ८ गेज तारेने ताण द्यावा. त्यासाठी १-१.५ फूट लांबीच्या दगडास दुहेरी तार बांधून तो दगड २ फूट जमिनीत पक्का गाडावा.

नंतर डांब बाहेरील बाजूस ओढून ६.५ फूट उंचीवर ताणाच्या तारेने पक्का करावा.




तार खाली घसरू नये यासाठी डांबावर यू आकाराचा खिळा ठोकून तार पक्की करावी.

डांबांना ताण दिल्यानंतर ८ गेजची दुहेरी तार पीळ देऊन ६.५ फूट उंचीवर यू आकाराचा खिळा ठोकून त्यातून ओढून घ्यावी.


मंडपाची तार ओढण्यापूर्वी मंडपाच्या सर्व कोपऱ्यांतील डांब भक्कम असावेत, त्यांना ८ गेजच्या तारेने बाहेरच्या दोन्ही दिशेने दुहेरी ताण द्यावा.

तारा पुलरच्या साह्याने ताणून घ्याव्यात.

नंतर १० गेजची तार लाकडी बल्या उभ्या केलेल्या ओळीवर जमिनीपासून ६.५ फूट उंचीवर यू आकाराच्या खिळ्याने पुलरच्या साह्याने ओढून पक्की करावी. त्यानंतर २ फूट अंतरावर १६ गेज तार ताणलेल्या तारेवर आडवी-उभी पसरावी.



भाजीपाला पिकास आधार देण्याची मंडप पद्धत




जमिनीपासून ६.५ फूट उंचीवर २४२ फूट आकाराचा तारेचा चौरस तयार होईल.

मंडप उभारणी वेल साधारण १-१.५ फूट उंचीचे होण्यापूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे.

**– ग्रामीण कृषी** मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी




## स्वयंपाक करताना भाजीत इन्स्टंट नूडल्स मसाला घालता? वाढतो हायपरटेन्शनचा धोका

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

भूक लागल्यानंतर पटकन काय बनवता येईल हा प्रश्न अनेकांना पडतो. अशावेळी पर्यायी पदार्थ असतो तो इन्स्टंट मॅगीचा आणि नूडलसचा.अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांना मॅगी खायला आवडते.अनेकांच्या अतिशय आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय. अगदी २ मिनिटांत होणारे नूडल्स आणि मॅगी हे अनेक जण चवीने खातात. मॅगीच्या ब्रॅण्डसोबत बाजारात अनेक नूडल्सचे प्रकार आले आहेत.इन्स्टंट मॅगीनंतर मॅगी मसाल्याने अनेक गृहिणींचे काम सोपे केले. भाज्यांना किंवा इतर पदार्थांना चव आणण्यासाठी मॅगी मसाला हमखास वापरला जातो. बाजारातही या मसाल्याचे अनेक छोटे पॅकेट उपलब्ध आहेत. परंतु, याचे अधिक प्रमाणात सेवन केल्याने आपल्या आरोग्याला धोका होऊ शकतो. असं आहारातज्त्र अमिता गद्रे यांनी सांगितलं आहे. आहारतज्ज्ञ अमिता गद्रे म्हणताय की, मॅगी मसाला खाऊ शकतो का? तर हो... मॅगी मसाला खाताना तो जपून खायवा हवा. ६ ग्रॅमच्या मॅगी मसाला पॅकेटमध्ये ६५५ ग्रॅम सोडियम असते. दिवसाला आपल्याला शरीराला २००० मिलीग्रॅम इतक्या सोडियमची आवश्यकता असते. याच्या एका पॅकेटमध्ये चार जणांसाठी जेवण बनवले तर चांगले परंतु, एकाच व्यक्तीसाठी एक पॅकेट वापरले तर शरीरातील सोडिमचे प्रमाण वाढते. तसेच या मसाल्याचा वापर केल्यानंतर जेवणात अधिक मिठाचा वापर करु नका. जर सकाळी आपण भाजी किंवा भातात या मसाल्याचा वापर केला असेल तर संध्याकाळी




अधिक हाय फ्लेमवर तयार केलेले चायनिस किंवा नुडल्स खाऊ नये. जर अधिक प्रमाणात मिठाचे सेवन केले तर हायपरटेन्शनचा धोका वाढतो. पण जर या चवीमुळे मुलांना भाज्या किंवा इतर पदार्थ आवडत असतील तर १० ते १५ दिवसांनंतर किंवा महिन्यातून २ वेळाच या मसाल्याचा वापर करायला हवा. आपल्या शरीरात मिठाचे प्रमाण वाढले तर त्याचा थेट परिणाम हृदयावर होतो. ज्यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो. जास्त मीठ खाल्ल्याने सिडिटी, गॅस आणि मूळव्याध सारख्या समस्या उद्भवतात. मायग्रेनची समस्या, अचानक रक्तदाब वाढणे, लवकर झोप न येणे या आजारांचा धोकाही वाढतो. त्यामुळे आपण पुरेसे आणि योग्य प्रमाणात मीठाचे सेवन करायला हवे.

# केदारनाथला जाण्याचा प्लान करताय?

## ९ तासांचा प्रवास आता फक्त ३६ मिनिटांत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**नवी दिल्ली:–** हिंदुंच्या पवित्र ४ धाममधील महत्वाचे धाम असलेल्या केदारनाथ येथे जाण्यासाठी रोप वे बनवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज, बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यासंदर्भात वैष्णव म्हणाले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय रोप वे विकास कार्यक्रमांच्या पर्वतमाला परियोजनेअंतर्गत उत्तराखंडमधील सोनप्रयाग ते केदारनाथ दरम्यानच्या १२.९ किलोमीटर लांबीच्या रोप वे प्रकल्पाला मंजुरी देण्यात आलीय. या रोप-वेचा मोठा फायदा होणार असून यामुळे ८ ते ९ तासांचा प्रवास ३६ मिनीटात होईल. विशेष म्हणजे या रोप-वे कारमध्ये ३६ लोक बसण्याची क्षमता असेल. एकूण १२.९ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पाचा खर्च ४ हजार ८१ कोटी रुपये असून त्याला केंद्र सरकारने मंजुरी दिल्या अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

दररोज १८ हजार प्रवाशां घेऊन जाणार रोप वे

उत्तराखंडमधील सोनप्रयाग ते केदारनाथ दरम्यानच्या या रोपवेची क्षमता १८०० प्रवासी प्रति तास असणार आहे. यामुळे दर दिवशी तब्बल १८ हजार प्रवासी रोप वेने प्रवास करू शकतात.

रोपवेमुळे हॉस्पिटॅलिटी, ट्रॅव्हल, फूड तसेच पर्यटन यासारख्या उद्योगांना संपूर्ण वर्षात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे दळवळणाला अधिक प्रोत्साहन मिळेल तसेच आर्थिक विकासाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असेल.

# झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती-पत्नीचं नाव

**विर्दभ प्रजासत्ताक**


**दि.६मुंबई :** जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी आहे. या दिवसाच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत एक महत्त्वाचा निर्णय झाला आहे. या निर्णयानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी अशी दोघांच्याही नावाची नोंद केली जाणार आहे. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात हा नियम झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी लागू असेल.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नव्या नियमानुसार पुनर्विकासात मिळणारे घर पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे बंधनकारक आहे. संपत्तीत पती आणि पत्नी या दोघांचाही वाटा असल्याचे समजतात.

याच पद्धतीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी या दोघांचाही हक्क असेल.

घरावर पती आणि पत्नीचे हक्क असल्यास कायदेशीर अडचणी येत नाही. मात्र, काही प्रकरणात अशी नावांची नोंद नसल्यास पतीच्या निधनानंतर महिलेस कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागते.

ही समस्या सोडवण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी अशी दोघांच्याही नावाची संयुक्त नोंद करण्याचा निर्णय झाला आहे.



झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट-२ मध्ये यासाठी बदल करण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता घरांचे वितरण करताना घरांच्या वाटपपत्रावर पती-पत्नीवर दोघांची नावे नोंद करुन घरे वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ६ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


## सरपंच असावा तर असा.....

# सरपंचाला २० हजारांची लाच देणारे २ शासकीय कॉन्ट्रॅक्टर जाळ्यात

### रोडच्या निकृष्ट कामाची तक्रार मागे घेण्यासाठी सरपंचाना आमिष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धा.रेल्वे–** ऐरवी, लाच घेताना अटक... अशीच कार्यवाही होते.. आणि अशाच बातम्याऐकतोववाचतो. पण, धामणगाव रेल्वे तालुक्यात बुधवारला अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अगदीया उलट, लाच देणारा तेवढाच गुन्हेगार... हे वाक्य खरे ठरवत ऐतिहासिक व धक्कादायक कार्यवाही करीत सरपंचाना लाच देणारे दोन शासकीय कंत्राटदारांना ताब्यात घेतले. या कार्यवाहीमुळे जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ उडालीय आहे.रोडचे निकृष्ट काम केल्यानंतर कंत्राटदारां विरुद्ध बांधकाम विभागाकडे केलेल्या तक्रारी मागे घ्याव्यात, तसेच काम पूर्ण झाल्यानंतरग्रामपंचायतकडून प्रमाणपत्र देताना अडचण निर्माण करू नये, यासाठी हिंगणगावचे सरपंचांना २० हजार रुपयांची लाच देण्याचे आमिष दाखविले. या प्रकरणी सरपंचानी आमिषाला बळी न पडता, एसीबीकडे तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत एसीबीने बुधवारला ग्रामपंचायत कार्यालयातच सापळा रचून शासकीय कंत्राटदारमनिष नरेंद्र श्रीखंडे आणि शासकीय कंत्राटदार सुदेश मेघाणी या दोघांना सरपंच ठाकुर यांना २० हजारांची लाच देताना ताब्यात घेतले. लाचखोरीच्या प्रकरणात प्रथमच लाच घेणाऱ्या ऐवजी लाच देणाराच एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ उडाली आहे.प्राप्त माहितीनुसार, शासकीय कंत्राटदार मनिष नरेंद्रराव श्रीखंडे (२९ वर्षे, केदारेश्वर मंदीर रोड केदार चौक



वरूड, जि. अमरावती आणि सुदेश भरत मेघाणी, वय ३२ वर्षे, व्यवसाय शासकिय कंत्राटदार, रा. यशवंत बाबा कॉलनी, अमरावतीरोड वरूड यांना मौजे ग्रामपंचायत हिंगणगाव येथील रस्ता तयार करण्याचे कामकरण्याचे काम मिळाले होते. या दोन्ही कंत्राटदारांनी हे काम १५ दिवसापुर्वी सुरू केले. मात्र रस्त्याचे काम शासनाच्या नियमाप्रमाणे न केल्याने हिंगणगावचे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकुर यांनी बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. त्यामुळे तक्रारदार यांनी यातील आरोपीने निकृष्ट काम केल्यामुळे तक्रारी मागे घ्याव्या. आणि कामकाज पुर्ण झाल्यावर ग्रामपंचायत कडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रामध्ये अडचणनिर्माणकरूनयेयासाठी कंत्राटदार श्रीखंडे यांनी तक्रारदार सरपंच ठाकुर यांना लाच रक्कम म्हणून २०,००० रु. आमिष देण्याचे मान्य केले. तसेच आरोपी कंत्राटदार मेघाणी यांनी लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे सरपंच ठाकुर यांनी या प्रकरणी अमरावती एसीबीकडे या प्रकरणी तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत एसीबी पथकाने बुधवार ५ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वा. दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय हिंगणगाव येथे सापळा रचला. यावेळी कंत्राटदार मनिष श्रीखंडे आणि सुदेश मेघाणी यांनी पंचासमक्ष सरपंच ठाकुरयांना २०,००० रुपये लाचरक्कमदिल्याने तत्काळ या दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांचेविरूध्द दत्तापुर पोलीस ठाणे, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याचीप्रक्रिया सुरु आहे. ही कार्यवाही एसीबीचे पोलिस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलिस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलिस उपअधीक्षक मंगेश मोहोड, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. संतोष तागड, तसेच पो.नि. केतन माजरे, पो.हवा. प्रमोद रायपुरे, पोहवा. युवराज राठोड, पोहवा. राजेश मेटकर, पोलीस अंमलदार शैलेश कडु, अमलदार वैभव जायले, चालक पोउपनि. सतिश किटुकले, चालक पोहवा गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

## मोर्शी पोलिसांची विशेष मोहिम फत्ते

# अटक वॉरन्टच्या १५ फरार आरोपींना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मोर्शी,** विविध गुन्ह्यात न्यायालयातून जामिन मिळताच तारखेवर गैरहजर राहणाऱ्या आरोपींविरोधात न्यायालयाने अटक वॉरन्ट जारी केले होते. असे बरेच वॉरन्ट पेंडींग असल्याने मोर्शीचे ठाणेदार नितिन देशमुख यांनी वॉरन्ट-समन्स स्कॉडसह मिळवून विशेष मोहिम राबवून अटक वॉरन्टच्या तब्बल १५ फरार आरोपींना अटक केली. आरोपींमध्ये दोन महिला आरोपींचा देखील समावेश आहे.



### जामिन मिळताच न्यायालयात तारखेवर गैरहजर दोन महिला आरोपींचा समावेश

अरविंद हरिभाऊ धुर्वे रा. गणेशपुर, जितेंद्रदादारावमेटकर रा.गडीपुरा खेड, भुषण चंद्रकांत खाडेकर रा. खेड, नितिन महादेवराव मरस्कोल्हे, रा. अंबाडा, आकाश प्रकाश धुर्वे रा.गिट्टी खदान, मोर्शी, प्रणय मनोहराव आगरकर,रा. रामजीबाबा नगर, मोर्शी, रोशन दादाराव नेवारे रा. खोलवाटपुरा, मोर्शी, विजय भाऊरावजी हरले रा. आंबडेकर चौक, मोर्शी, ओम रवीद्र घाटोळ, रा. सतिनगर, मोर्शी, रोशन सुधारकर धर्माळे रा. रूख्मिणीनगर, मोशी, शेख अलताफ उर्फ छोटु मोहम्मद अक्सर, मोर्शी, योगेश अशोकराव उईके दोन्ही रा. खोलवटपुरा, दोन महिला अशी अटकेतील फरार आरोपींची नावे आहेत.

मोर्शीचे ठाणेदार नितिनदेशमुखयांनी ठाण्यातील वॉरन्ट-समन्सस्कॉड चे प्रमुख पीएसआय अमोल बुरकुल, एएसआय पंकज साबळे, कॉस्टेबल उमेश ढेवले, सुमित पिढेकर, विलास कोहळे, स्वप्निल बायस्कर, सौरभ धरमठोकर, एलपीसी लता धोटे, रिना तंतरपाळे, अरूण चव्हाण यांच्या मिळून ही विशेष मोहिम फत्ते केली.

# अमरावतीत 'सीसीआय'ची कापूस खरेदी पुन्हा बंद

### पुढील आदेशापर्यंत खरेदी बंद राहणार, कापूस गाठी खरेदी अधिक झाल्यामुळे घेतला निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–**

सीसीआयने अमरावती मध्ये सीसीआय मार्फत सुरु असलेली कापूस खरेदी गुरुवार ६ मार्चपासून अचानक पुन्हा बंद केल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले आहे. विशेष म्हणजे यापूर्वी अमरावतीमध्ये ११ फेब्रुवारीपासून सीसीआयने कापूस खरेदी बंद केली होती. त्यानंतर २८ फेब्रुवारी अमरावती जिल्ह्यातील केंद्रांवर कापूस खरेदी सुरु झाली होती. अवघ्या सहा दिवसानंतरच पुन्हा अमरावतीच्या ४ केंद्रावर खरेदीसाठी पुढील आदेशापर्यंत ब्रेक लावल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजीचा सूर व्यक्त केल्या जात आहे.

खरिपातील कापसाच्या हंगामाची जवळपास उलंगवाडी झाली आहे. दुसऱ्या वेच्यातील कापसानंतर सीसीआयने तांत्रिक कारण देत कापसाची खरेदी ११ फेब्रुवारीपासून बंद केली होती. पोर्टलमध्ये अडचणी असल्याचे तांत्रिक कारण देण्यात आले होते. पण, केंद्रांवर येत असलेल्या कापसाची प्रत व त्यातील उतारा कमी येण्याच्या शक्यतेने ही खरेदी बंद करण्यात आली होती, अशी माहिती आहे. त्यानंतर कशीतरी २८ फेब्रुवारीला पुन्हा खरेदी सुरु झाली. मात्र केवळ सहा दिवसातच ब्रेक लावण्यात आला. क्षमतेपेक्षा अधिक खरेदी झाल्याने कापसाच्या गाठी ठेवण्यासाठीजागा नसल्याचे विश्वसनीय सूत्राकडून माहिती मिळत आहे. मात्र खरे कारण सांगायला कुणीही संबंधित अधिकारी संपर्क साधला असता तयार नाही.

अमरावती एपीएमसी परीक्षेतात भातकुलीमध्ये २, नांदगाव पेठ १ आणि चांगापूर येथे १ अशा चार केंद्रावर सीसीआय मार्फत हमीभाव ७४११ रुपये क्विंटलने खरेदी सुरु होती.

मात्र आता ही खरेदी ६ मार्चपासून बंद करण्यात येत असल्याचे जाहिर करण्यात आले आहे.दोन वेच्यानंतर फरदळ प्रतीचा कापूस बाजारात येतो. 'सीसीआय' हा कापूस खरेदी करीत नाही. पहिल्या दोन वेच्यातील कापसाची खरेदी करतानाही दुसऱ्या वेच्यातील कापसाचे हमीदर सीसीआयने शंभर रुपयांनी कमी केले होते. खुल्या बाजारात हमीदरापेक्षा कमी दर असल्याने शेतकऱ्यांनी आधी सीसीआयलाच प्राधान्य दिले. पहिल्या वेच्यातील बहुतांशकापूस सीसीआयने हमीदराने खरेदी केला आहे. त्यामुळे खासगी बाजारातील उलाढालीवर मोठा परिणाम झाला आहे. दुसऱ्या वेच्यातील काही प्रमाणात कापूस व्यापाऱ्यांनी खरेदी केला आहे. या दरम्यान सीसीआयने कापसाची खरेदीच बंद ठेवली. त्याचा लाभव्यापाऱ्यांनी घेत शेतकऱ्यांकडील कापसात प्रतिक्टिल दोन किलोपर्यंत रुईचा उतारा कमी येत असल्याचे कारण देत कट्टी कापण्यास सुरुवात केली आहे. सीसीआयला ३४ किलोपर्यंत रुईचा उतारा आवश्यक आहे. काही शेतकऱ्यांच्या कापसात ३८ किलोपर्यंत उतारा गेला आहे.


> **सहा दिवसातच खरेदी बंद**
>
> कापसाचा हंगाम संपत आला असून उलंगवाडी होऊ लागली आहे. सीसीआयने पुन्हा २८ फेब्रुवारीपासून खरेदी सुरु केल्याने शेतकऱ्यांनी घरात साठवून ठेवलेला कापूस केंद्रांवर आणणे सुरु केले होते. मात्र सहा दिवसातच पुन्हा खरेदी बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

# जिल्हा परीषदेत बजेटची लगबग सुरू

## २० ते २७ मार्च दरम्यान झेडपीचे बजेट!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,** मार्च एण्डींगसह अर्थसंकल्पाची लगबगसद्याजिल्हापरिषदेत दिसून आली. वित्त विभागासह सर्वच



विभागामध्ये बजेटचे नियोजन केल्या जात असल्याने अधिकारी, कर्मचारी कामाला लागले आहेत. २० ते २७ मार्चदरम्यान जिल्हा परिषदेचे बजेट प्रशासक संजिता महापात्र सादर करणार आहे.

जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी २० ते २७ मार्च दरम्यान जमा, खर्चाचे बजेट सादर केले जाते. हे बजेट जिल्ह्याकरीता महत्वाचेअसल्याने विविध विकास कामांवर निधीचीं तरतुद याअंतर्गत केली जाते. सदर बजेट जिल्हा परिषदेचे वित्त सभापती हे अध्यक्षांच्या उपस्थितीत सादर करतात. परंतु सद्या जिल्हा परिषदेत प्रशासक असल्याने यापुर्वी तिनदा सीईओंनी बजेट सादर केले आहे. यंदाही मुख्य प्रशासक तथा सीईओ संजिता महापात्र यांच्याकडे बजेट सादर करण्याची जबाबदारी असल्याने या बजेटची लगीणघाईजिल्हापरिषदेत पाहावयास मिळत आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी देखील या अधिनिस्त कार्यालयाचे कामकाज सुरू ठेवले जात आहे. २० ते २७ मार्च दरम्यान जिल्हा परिषद जिल्ह्याचे बजेट सादर करण्याची शक्यता आहे.

# होळीनिमित्त मध्य रेल्वेच्या ७६ अतिरिक्त विशेष गाड्या

## विदर्भ, मराठवाडा आणि कोकणात जाण्यासाठी उपयोग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** प्रवाशांना होळी सणानिमित्त आपल्या गावी जाण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई आणि पुणे विभागातून विशेष रेल्वे गाड्या सोडण्यात येणार आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणात जाण्यासाठी या रेल्वेगाड्यांचा उपयोग होणार आहे. एकूण ७६ विशेष गाड्या वेगवेगळ्या मार्गावरून धावणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

गाडीक्रमांक ०२१३९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर आणि परतीची ०२१४० नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या विशेष रेल्वेगाड्या ९ मार्च, ११ मार्च, १६ मार्च आणि १८ मार्चला धावणार आहेत. ०१४६९ पुणे-नागपूर ११ आणि १८ मार्चला ०१४७० नागपूर-पुणे १२ आणि १९ मार्चला, ०१४६७ पुणे-नागपूर १२ आणि १९ मार्चला, ०१४६८ नागपूर-पुणे १३ आणि २० मार्चला धावणार आहे. गाडीक्रमांक ०११५१ छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनस-मडगाव तसेच परतीची ०११५२ मडगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या दोन विशेष गाड्या ६ आणि १३ मार्च रोजी धावणार आहेत. ०११०५ लोकमान्य टिळक



टर्मिनस-नांदेड आणि ०११०६ नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस या विशेष गाड्या १२ मार्च आणि १९ मार्च रोजी धावणार आहेत.०११२९ लोकमान्य टिळक टर्मिनस-मडगाव १३ मार्च आणि २० मार्च रोजी तर ०११३० मडगाव-लोकमान्य टिळक टर्मिनस १४ आणि २१ मार्चरोजी, ०१०६३ लोकमान्य टिळक टर्मिनस-तिरुवअनंतपूरम ६ आणि १३ मार्चला तर ०१.०६४ तिरूवअनंतपूरम - लोकमान्य टिळक टर्मिनस ८आणि १५ मार्चला धावणार आहे.०११२३ लोकमान्य टिळक टर्मिनस-महू ही विशेष गाडी ७, ९, १४ आणि १६ मार्च रोजी धावणार असून परतीची ०११२४ महू-लोकमान्य टिळक टर्मिनस ९, ११, १६ आणि १८ मार्च रोजी धावणार आहे. ०१४९१ पुणे-हजरत निझामुद्दिन ७ आणि १४ मार्चला, ०१४९२ हजरत निझामुद्दिन ८ आणि १६ मार्चला सुटणार आहे. ०१४३१ पुणे-गाझीपूर सिटी ७, ११, १४ आणि १८ मार्चला सुटणार आहे. तर ०१४३२ गाझीपूर सिटी-पुणे ९, १३, १६ आणि २० मार्च रोजी सुटणार आहे.०११०९ लोकमान्य टिळक टर्मिनस-दानापूर १०, १५ आणि १७ मार्चला, ०१०१० दानापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस ११, १६ आणि १८ मार्चला सुटणार आहे. ०१४८१ पुणे-दानापूर १०, १४ आणि १७ मार्चला, ०१४८२ दानापूर-पुणे १२,१६ आणि १९ मार्च रोजी सुटणार आहे. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून कन्याकुमारी, लोकमान्य टिळक टर्मिनसवरून समस्तीपुर, वाराणशीसाठी विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत.

### कारागृह प्रशासनाने राबविला गळाभेटीचा अभिनव उपक्रम

# मुले, मुली, नातवांना भेटून कारागृहातील कैदी भारावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,**

कारागृहात विविध गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना त्यांच्या लहान मुलांना वाढत्या वयात पाहता यावे म्हणून जेल डीजी कार्यालयाव्दारे गेल्या दहा वर्षापासून कैद्यांसाठी गळाभेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार आज अमरावती कारागृहात कारागृहा अधिक्षक किर्ती चिंतामणी यांच्या नेतृत्वात कैद्यांसाठी गळाभेट कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आले. यामध्ये ३० कैद्यांनी सहभाग घेतला असून त्यांनी आपआपल्या ४९ मुले, मुली, नातवांची भेट घेतल्याने हे आनंदाने भारावून गेले होते.कारागृहातील कैद्यांना घरातील सदस्यांना भेटता यावे म्हणून त्यांना थेट मुलाखत, ऑनलाईन मुलाखत, पत्रव्यवहार, पॅरोल व संचेती रजेची सुविधा सुविधा देण्यात येते. परंतु, लहान मुलांना आईवडीलांच्या छत्रछाये खाली वाढणे गरजेचे असल्याने जेल डीजी कार्यालयाने दहा वर्षापासून कारागृहातील कैद्यांसाठी त्यांना त्यांच्या १८ वर्षाखाली मुले, मुली, नातू यांना भेटता यावे म्हणून गळाभेटचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार आज ३ मार्च रोजी अमरावती कारागृहात कारागृहा अधिक्षक किर्ती चिंतामणी यांच्या नेतृत्वात कैद्यांसाठी गळाभेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ३० कैद्यांनी सहभाग घेतला असून त्यांनी आपआपल्या ४९ मुले, मुली, नातवांची भेट घेतल्याने हे आनंदाने भारावून गेले होते. यावेळी कैद्यांनी त्यांना मिळणाऱ्या कामाच्या पैशातून त्यांनी कारागृहातील कॅन्टींगमधून चॉकलेट, बिस्कीट घेऊन मुलांना खाऊ घातले. तसेच कारागृहप्रशासनातर्फे कैद्यांच्या मुलांना केळी व खिचडीचा नाश्ता देण्यात आला. गळाभेट कार्यक्रम अतिशय कौटुबींक वातावरणातपार पाडण्यासाठी कारागृहात भव्य मंडप टाकण्यात आला होता. आपआपल्या वडीलांना भेटता आले म्हणून अनेक मुलांनी




कारागृह अधिक्षक चितांमणी यांचे माईकवर आभार मानले. अतिशय कौटुंबीक वातावरणात गळाभेटचा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कारागृह अधिखक किर्ती चिमांमणी, अतिरिक्त अधिक्षकविलास भोइते, उप अधिक्षक प्रदीप इंगले, वरिष्ठ कारागृह अधिकारी रवींद्र रावे, कारागृह शिक्षक संजय घोलप, ललीत मुंडेसह आदि अनेक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# खतामध्ये भेसळ! दुकानदार, कंपनी व्यवस्थापकाला २ वर्षे शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६बुलढाणा : –** खामगाव येथील न्यायालयाने शेतकऱ्याला न्याय देणारा आणि खत उत्पादक कंपन्यांना जरब बसविणारा निकाल दिला आहे. मिश्र खतामध्ये भेसळ आढळ्याने कृषीदेव खत कारखान्याचे मॅनेजर पी व्ही देशमुख व कृषी केंद्र वरंवट बकालचे नंदकिशोर राठी यांना २ वर्षाचा साधा कारा दंड वास व १० हजार रूपये अशी शिक्षा खामगाव न्यायालयाने सुनावली आहे. या निकालाचे कृषिप्रधान बुलढाणा जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यातून स्वागत करण्यात येत आहे.

मिश्र खतामध्ये भेसळ आढळ्याने व ते खत आरोपी यांनी आसलगाव येथील दुकानातून विक्रीसाठी ठेवल्याने त्या बाबतचे दोन प्रयोगशाळेचे अहवाल मिळाल्यावर खामगाव येथील न्यायालयाने आज दोन आरोपींना प्रत्येकी २ वर्षाची साधी सजा व १० हजार रूपये दंड ठोठवला आहे. एवढेच नव्हे तर दंड न भरल्यास ३ महिने सश्रम सजा अशी शिक्षा देखील दिली. आरोपी कृषिदेव खत कारखाना अमरावतीचे मॅनेजर पी. व्ही. देशमुख राहणार अमरावती व नंदकिशोर भिकमचंद राठी, राठी कृषी केंद्र वरंवट बकाल यांना ही शिक्षा सुनविण्यात आली आहे.हे प्रकरण २०१३ रोजी घडले होते. तत्कालिन पंचायत समिती कृषी अधिकारी कार्यालय संग्रामपूर कडून चक्रधर उंद्रे यांनी २८ जून २०१३ रोजी राठी कृषि



केंद्र दुकानाची तपासणी केली. त्यामध्ये त्यांना मिश्र खतात अनियमितता आढळली आली. त्यावरून मिश्र खत काढून परीक्षणा करता पाठवले, परीक्षण अहवाल ३१ जुलै २०१३ रोजी प्राप्त होऊन त्यामध्ये मिश्र खतात मानका प्रमाणे नायटरोजन, फोस्पेट व पोटॅश ची मात्र प्रमाणे आढळली नाही. आरोपीनी त्या तपासणी अहवाला विरुद्ध अमरावती कार्यालयात अपील दाखल केले.

यामुळे खताचे नमुने सॅम्पल पुन्हा तपासणी साठी कर्नाटक राज्यातील बंगळूर येथील प्रयोग शाळेत पाठवण्यास सांगितले. त्यावरून नमुने हे बंगळूर येथे पाठवले.त्याचा अहवाल हा २६ फेब्रुवारी २०१४ रोजी प्राप्त झाला. त्यामध्ये सुद्धा मानका प्रमाणे मिश्रखत बनवलेले नसल्याचे दिसून आले. त्यावरून १६ डिसेंबर २०१५ रोजी चक्रधर पुंडलिक उद्रे यांनी न्यायालयात प्रकरण दाखल करून 'फर्टीलाजर कंट्रोल ऑर्डर' कलम नुसार व जीवनावशक वस्तू कायद्याप्रमाणे प्रकरण दाखल केले.

प्रकरणात सरकार तर्फे सरकारी वकील अॅड. उदय आपटे यांनी साक्षीदार तपासले. दोन्ही कायद्याच्या तरतुदीवर युक्तीवाद केला तसेच प्रकरण हे शेतकऱ्यांच्या शेती बाबतच्या संवेदनशील मुद्यावर असून प्रकरणात उंद्रे यांची साक्ष तसेच दोन्ही प्रयोगशाळेचा अहवाल च्या आधारे आज विद्यमान न्यायालयाने दोन्ही आरोपींना कायद्याच्या तरतुदी नुसार प्रत्येकी २ वर्षाची सजा व प्रत्येकी १० हजार रूपये दंड व तो न भरल्यास ३ महिन्याची सजा असा महत्वपूर्ण निर्णय दिला.

# न्यायालयाच्या आदेशानंतरशे गावात शेकडो अतिक्रमणे जमीनदोस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६शेगाव–** न्यायालयाच्या आदेशानुसार शेगाव येथील तालुका क्रीडा संकुलावरील अतिक्रमण काढण्याची कारवाई दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. बुधवारी, पाच मार्च रोजी संध्याकाळ अखेर कमीअधिक १९२ अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली.

यापूर्वी काल चार मार्च रोजी प्रचंड पोलीस बंदोबस्तात बुलडोजरचा वापर करून अतिक्रमणे काढण्यास सुरुवात झाली. मुरारका शाळेजवळील शीट क्रमांक १६, भूखंड २० येथे असलेल्या तालुका क्रीडा संकुलाच्या जागेवर २००० पासून अनधिकृत वस्ती वाढली . अनेक वर्षापासून प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याचे प्रयत्न केले. मात्र स्थानिक राजकीय हस्तक्षेपामुळे कारवाई अडकली होती. मात्र न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा प्रशासन आणि स्थानिक यंत्रणानी कठोर भूमिका घेतली . न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व अतिक्रमणधारकांना नोटीस बजावण्यात आली होती. स्वतः अतिक्रमण हटवावे, प्रशासन स्वतः अतिक्रमण काढेल, असा ईशारा देण्यात आला होता . यावेळी होणाऱ्या नुकसानाची जबाबदारी कोणत्याही परिस्थतीत अतिक्रमणधारकांचीच राहील, असे स्पष्ट करण्यात आले होते . ही कारवाई आज दुसऱ्या दिवशीही सुरु होती. परिसरात असलेला मलबा काढण्यात येत आहे.

शेगाव क्रीडा संकुलावरील अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासनाने याआधीही अनेकदा मोहिमा आखल्या, मात्र स्थानिक राजकीय हस्तक्षेप व दबावामुळे त्या मोहिमा अपयशी ठरल्या. मात्र आता न्यायालयाच्या आदेशामुळे प्रशासन पूर्ण तयारीनिशी उतरले असून,सलग दोन दिवस कारवाई करण्यात आली आहे.काही अतिक्रमण



धारकांनी स्वतः हुन आपले अतिक्रमण हटविले तर बहुतेक अतिक्रमणावर बुल्डोजर चालविण्यात आला आहे. यावेळी नगर पालिका प्रशासन, पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते. तसेच तीनशे पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता.

# महाराष्ट्राचे ॲडीशनल डीजी सुनील रामानंद १० फेब्रुवारीला शहरात

## सीपी ऑफीससह पोलिस ठाण्यांचे निरीक्षण करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** मुंबईतील डीजी कार्यालयातील नियोजन व समन्वय विभागाचे ॲडीशनल डीजी सुनील रामानंद हे १० फेब्रुवारीला अमरावती शहरात तीन दिवसाच्या दौऱ्यावर येणार असल्याने पोलिसांनी त्यांना देण्यात येणाऱ्या सलामीची रंगीत तामिल सुरू आहे.एडीजी रामानंद तीन दिवस सीपी ऑफीससह पोलिस ठाण्यांचे इस्पेक्शन करणार असल्याने पोलिस दलात चांगलीच धावपळ पहायला मिळत आहे.

महाराष्ट्राचे एडीजी सुनिल रामानंद यांचे १० फेब्रुवारी रोजी सकाळी अमरावतीत अंबा एक्सप्रेसने आगमन वडाळी भागातील एसआरपीएफ कॅम्प मधील विश्राम भवनात काही वेळ राहून १० वाजता पोलिसआयुक्त कार्यालयात येणार आहेत. पोलिस आयुक्तालयात अमरावती रेंजचे आयजी रामनाथ पोकळे, अमरावती शहराचे सीपी नविनचंद्र रेड्डी, ग्रामीणचे एसपी विशाल आनंद व विभागातील



सर्व एसपींसोबत बैठक घेणार आहे. या बैठकीनंतर एडीजी रामानंद पोलिस आयुक्त कार्यालयासह शहरातील पोलिस ठाण्याचे इस्पेक्शन करणार आहेत. तसेच १३ फेब्रुवारी पर्यंतच्या मुक्कामात ते अमरावती ग्रामीण एसपी ऑफीसचेही इस्पेक्शन करणार आहेत. एडीजी रामानंद हे तिन दिवसाच्या दौऱ्यावर येत असल्याने शहर व ग्रामीण पोलिसांनी त्यांना देण्यात येणाऱ्या सलामीची रंगीत तामिल सुरू केली आहे. तर सीपी ऑफीससह आयुक्तालयात सर्व पोलिस ठाणे, वाहतुक शाखा, गुन्हेशाखा कार्यालय चमकविण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रिया....मुदतवाढीनंतर ३५० प्रवेश वाढले

# प्रवेशाला शेवटचे ५ दिवस शिल्लक आतापर्यंत एकूण १,४२७ प्रवेश निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** जिल्ह्यात आरटीई अंतर्गत १ हजार ४२७ बालकांचे प्रवेश निश्चित झाले असून अद्यापही ९६९ बालकांचे प्रवेश शिल्लक आहे. या प्रवेशाला आता शासनाकडून १० दिवसांची म्हणजे १० मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मुदतवाढीनंतर या पाच दिवसांत ३५४ प्रवेश वाढले आहेत. त्यामुळे प्रवेशाची गती मात्र मंद असल्याचे दिसून येत आहे.२०२५–२६ या शैक्षणिक वर्षांकरिता आरटीई प्रवेशाला १४ फेब्रुवारीपासून सुरूवात करण्यात आली. जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २हजार ४३०




जागांकरिता राबविली जात आहे. यासाठी जिल्ह्यातून ८ हजार १४१ प्रवेश अर्ज प्राप्त झाले होते. पहिल्या समितीकडून पडताळणीझालेल्या अर्जानंतरप्रवेश स्विकारण्यात आले. परंतु याची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत असताना २ हजार ३९६ पैकी केवळ १ हजार ३२३ पाल्यांचेचप्रवेशनिश्चितझालेहोतेतर १०७३ पाल्यांचे प्रवेश शिल्लक होते. त्यामुळे पालकांकडूनमुदतवाढीची मागणी होत असताना शासनाकडून १० मार्च पर्यंत या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढीनंतर या ५ दिवसांत केवळ ३५४ प्रवेश निश्चित झाले आहेत. सद्यास्थितीत १ हजार ४२७ बालकांचे प्रवेश निश्चित झाले असून अद्यापही ९६९ बालकांचे प्रवेश शिल्लक आहेत. शेवटचे पाच दिवस शिल्लक असताना या पाच दिवसांत ९६९ प्रवेश संबधित शाळांमध्ये निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून पालकांना करण्यात आले आहे.

# वाघ, बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी आता 'सोलर फेन्सिंग'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर : –** राज्यात प्रामुख्याने वाघांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे काही शहरी भागांसह ग्रामीण भागात विशेषतः शेतात काम करणाऱ्या नागरिकांवर त्यांच्या हल्ल्याच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. त्यामूळे नागरिकांच्या जीवितासह शेतीचेही मोठे नुकसान होत आहे.याची कबुली देत आता अशा हल्ल्यापासून वाचण्यासाठी राज्य सरकारने सोलर फेन्सिंगसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून साखळी कुंपणासाठीही सरकार सकारात्मक असून, त्यासंदर्भात लवकरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी विधानसभेत एका लक्षवेधीला उत्तर देताना स्पष्ट केले.

भंडारा जिल्ह्यालगत असलेल्या कोका वन्यजीवन अभयारण्याच्या बफर झोनमधील एका गावात वाघाने महिलेवर हल्ला करून तिचा जीव घेतला.या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वन विभागाच्या विरोधात चक्काजाम आंदोलन केले.तसेच,बिबट्यांच्या हल्ल्यामुळेही जीवितहानी होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.त्यावर



सरकारने कायमस्वरूपी मार्ग काढावा व अशा संरक्षित वनांना साखळी कुंपणाने बंदिस्त करावे अशा आशयाची एक लक्षवेधी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत उपस्थित केली होती. त्याचवेळी वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांना शेतीच्या कामात अडथळा येत असून शेतकरी भयभीत असल्याने शेती हंगामात ते शेतात जाऊ शकत नाहीत. त्यामुळे जंगलालगतच्या गावांची नोंद घेऊन सोलर किंवा साखळी कुंपण करण्याची तातडीची आवश्यकता असल्याचा मुद्दा त्यांनी यावेळी प्रकर्षाने उपस्थित केला.

मात्र त्याचवेळी वाघ आणि बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे वाढलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हस्तक्षेप करत याप्रश्नी येत्या शुक्रवारी संबंधित लोकप्रतिनिधीं सोबत विशेष बैठक घेण्याचे निर्देश मंत्री नाईक यांना दिले. त्यामूळे आता याच बैठकीत वाघ आणि बिबट्यांपासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी पुढील उपाययोजना ठरवण्यात येणार आहेत.

# 'सर' म्हटले नाही म्हणून ठाणेदार भडकले; 'डिलीव्हरी बॉय' अश्लील शिवीगाळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६यवतमाळ :–** एका कुरिअर सेवेच्या 'डिलीव्हरी बॉय'ने फोन केल्यानंतर 'सर' म्हटले नाही, या क्षुल्लक कारणावरून भडकेलेल्या पोलीस निरीक्षकाने डिलीव्हरी बॉयला अश्लील शिवीगाळ केली. त्यांनतर चार पोलीस कर्मचाऱ्यांसह कुरिअरच्या ऑफिसमध्ये जावून त्याला मारहाण केली. आर्णी येथे २३



फेब्रुवारी रोजी घडलेल्या या घटनेने पोलिसांची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. सध्या समाज माध्यमांत ही संभाषणाची ऑडिओ व मारहाणीची विडीओ क्लिप चांगलीच व्हायरल झाली आहे.

आर्णी येथील सनराईज लॉजेस्टिकमधील डिलिव्हरी बॉय धीरज गेडाम, रा. आर्णी हा पार्सल पोहचविण्याचे काम करतो. आर्णी पोलीस ठाण्याचे निरीक्षक केशव ठाकरे यांच्या नावाने पार्सल आले होते. त्यावर केवळ केशव ठाकरे, आर्णी व मोबाईल क्रमांक लिहिलेला होता. खात्री करण्यासाठी डिलिव्हरी बॉयने दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधला व केशव ठाकरे बोलताय का? असे विचारताच पारा भडकलेले ठाणेदार केशव ठाकरे यांनी, 'केशव ठाकरे तुझा नोकर आहे का?, कोणाशी बोलतो माहित नाही का? मी इथला ठाणेदार आहे?' असे म्हणत त्या मुलास शिव्यांची लाखोळी वाहिली व जिथे असशील तेथे येवून तुला दाखवतो, मी कोण आहे ते, असे म्हणत दमदाटी केली.त्यानंतर ते चार कर्मचाऱ्यांसह कुरिअरच्या कार्यालयात गेले. तेथे डिलिव्हरी बॉयची कानउघाडणी करत त्याच्या कानशिलातही लगावली. हा सर्व प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या डिलिव्हरी बॉयने केलेला कॉल व त्याला ठाणेदारांनी शिव्या घालत दिलेले उत्तर हे संभाषण समाज माध्यमांत व्हायरल झाले. तसेच कुरिअरच्या कार्यालयातील मारहाणीचा प्रसंगही व्हायरल झाला आहे. टवाळखोर गुंडाप्रमाणे ठाणेदार आणि त्यांचे कर्मचारी या दुकानात शिरतात.तेथील कर्मचाऱ्यास मारहाण करतात, ऐटीत बसतात. एखाद्या दक्षिण सिनेमाप्रमाणे हा सर्व घटनाक्रम बघायला मिळतो. डिलिव्हरी बॉयने या प्रकरणी अद्याप तक्रार दिली नाही. गेल्याच आठवड्यात आर्णी पोलिसांनी धाड टाकल्यानंतर एका दारू विक्रेत्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता ठाणेदारांच्या वर्तणुकीचा हा प्रकार उजेडात आल्याने वर्दीतील पोलिसच गावगुंडाप्रमाणे वागू लागले तर जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडून करावी, हा प्रश्न आर्णीकर विचारत आहेत.

# अमरनाथ यात्रा २०२५ साठी वेळापत्रक जाहीर

## ३ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत चालणार यात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५जम्मू काश्मीर–** अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. या बातमीनुसार, २०२५ च्या श्री अमरनाथ यात्रेची




तारीख जाहीर करण्यात आली आहे. भाविकांसाठी अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू होणार असून ही यात्रा ९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. ३९ दिवसांच्या या प्रवासासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था देखील केली आहे.अमरनाथ श्राइन बोर्डाचे अध्यक्ष आणि जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, ज्यामध्ये जम्मू–काश्मीरचे डीजीपी नलिन प्रभात, मुख्य सचिव अटल धुल्लू यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. या बैठकीत अमरनाथ यात्रेला अंतिम मान्यता देण्यात आली.श्री अमरनाथ यात्रेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. भाविकांना ३ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीत बाबा बर्फानी यांचे दर्शन घेता येईल. अमरनाथ यात्रा ३९ दिवस चालणार आहे.अमरनाथ यात्रा दरवर्षी ४५ ते ६० दिवस चालत असते. गेल्या वर्षी भाविकांनी २९ जून ते १९ ऑगस्ट या कालावधीत बाबा बर्फानीचे दर्शन घेतले होते. मात्र यंदा अमरनाथ यात्रा फक्त ३९ दिवस चालणार आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील अमरनाथ यात्रेसाठी ट्रस्ट आणि सरकारकडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांसाठी सुरक्षितता, निवास आणि लंगरसाठी विशेष सुविधा असणार असल्याची माहिती अमरनाथ श्राइन बोर्डाचे अध्यक्ष आणि जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिली.

विदर्भ प्रजासत्ताक

# महानगर क्षेत्रातील रुग्णालयांची धडक तपासणी मोहीम

## कायद्याचे उलंघन करणाऱ्या रुग्णालयावर होणार कार्यवाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती शहरात एकूण दोनशे तेवीस नोंदणीकृत रुग्णालय असून त्या सर्व रुग्णालयांची शासनाचे वतीने निर्देशित मार्गदर्शन तत्वा नुसार दिलेल्या नियम मध्ये कोणतेही रुग्णालय अंमलात आणत नसेल तर त्या रुग्णालयावर बॉम्बे नर्सिंग होम क्ट नुसार कार्यवाही करावी असे आदेश देण्यात आले त्याची अंमल बजावणी व्हावी त्या साठी सर्व महाराष्ट्र मधील महानगर पालिका व जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या सुशृता गृह व रुग्णालय यांची तपासणी करून त्याचा अहवाल सादर करण्यात यावा असे शासनाचे पत्र असल्यामुळे अमरावती महानगर पालिकेचे शहराचे आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांनी स्वतः उलट तपासणी केली जिथे रुग्णालय आहे तिथे अग्निशामक ना हरकत प्रमाण पत्र आहे आहे किंवा नाही इलेक्ट्रिक ऑडिट आहे का ?बायो वेस्ट परवानगी आहे का ?स्ट्रचकरल ऑडिट आहे का ? किती बेड ची मान्यता आहे व प्रत्यक्षात किती बेड आहेत? डॉक्टर किती आहेत प्रशिक्षित नर्स किती आहेत ? नागरिकांची सनद लावली आहे का ? उपचार फी बाबत ची माहिती दर्शनी भगत उपलब्ध आहे का महिलांच्या सुरक्षते साठी समिति गठित केली आहे का अश्या अनेक नियम अटी चे पालन मुंबई नर्सिंग क्ट नुसार करतात का त्या साठी तपासणी मोहीम ची सुरवात स्वतः आरोग्य अधिकारी यांनी केली असून त्या मध्ये मनपा उपायुक्त मेघना वासनकर यांनी धडक मोहीम चे दोन पथक निर्माण केले असून प्रथम पथकात डॉ संदीप पाटबागे वैद्यकीय अधिकारी व दुसऱ्या पथकात डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण वैद्यकीय अधिकारी यांना नेमून तत्काळ माहिती उपलब्ध करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात प्लास्टिक बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जनजागृतीप्लास्टिक बंदी मध्ये असलेले प्लास्टिक का वापरायचे नाही याबाबत सविस्तर माहिती कामधेनू नॅचरल्सचे संचालक नंदकिशोर गांधी यांनी एन.एस.एस च्या विद्यार्थ्यांना आणि उपस्थित असलेल्या गावकऱ्यांना तसेच ग्रामपंचायत च्या सरपंच यांना माहिती दिली. आपण घरून निघताना जसे मोबाईल घेऊन निघतो तसेच सोबत कापडी पिशवी सुद्धा घेऊन निघावे. प्लास्टिक बंदी ही कागदापूर्तीच




ठेवायचे नसून, याबाबत अंमलबजावणी करणे ही फार गरजेचे आहे. यासाठी शासन प्रशासनाने कायदया ची अंमलबजावणी केली तर आणि सामाजिक जबाबदारी म्हणून नागरिकांनी सुद्धा वापरायचे नाही असे ठरविले तर खरोखरच गाव सुद्धा प्लास्टिक मुक्त होईल आणि कचरा मुक्त होईल.

**गावात प्लास्टिक बंदीचे आठवण करून देणारे फलक**

काय तुम्ही आपल्या सोबत कापडी पिशवी घेतली आहे? अशी जाहिरात रुपी फलक लावण्यास सुचविले.सोबतच गावात स्टीलच्या भांड्याचे बर्तन बँक तयार करून गावकऱ्यांच्या सहभागाने ही बर्तन बँक चालू करण्याचे सांगितले. जेणेकरून कोणत्याही समारंभात गावात प्लास्टिकच्या लॅमिनेटेड पत्रावळी, द्रोण आणि सिंगल युज प्लास्टिक ग्लास चा वापर होणार नाही. त्यामुळे प्लास्टिकचा कचरा मुळे होणारे प्रदूषण वाचेल. जैवविविधता वाचेल व पर्यावरण टिकेल आणि जनावरांच्या पोटात प्लास्टिक जाणार नाही. या कार्यक्रमात कापडी पिशव्या वापरा याबाबत संदेश देऊन, कामधेनु नॅचरल आणि प्रा .गजानन काळे यांच्या माध्यमातून कापडी पिशव्यांचे वाटप सुद्धा करण्यात आले. यावेळी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती चे कार्यकारिणी सदस्य प्रा.गजानन काळे, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुणा तसरे, रा. से. यो. सह कार्यक्रम अधिकारी प्रा. अनुप आत्राम आदि उपस्थित होते.

# बडनेऱ्याच्या निमकरवाडीत उभारला टॉवर

## नोटीस बजावण्याकरिता गेलेल्या मनपा कर्मचाऱ्यांवर फेकले नालीतले पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

नोटीस बजावण्याकरिता गेलेल्या मनपा कर्मचाऱ्यांवर नालीतले पाणी फेकून जीवाने मारून टाकण्याची धमकी दिली. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी राजेश भिमरावजी मालपे (वय ४८ रा. निमकरवाडी, जुनीवस्ती, बडनेरा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.राजेश मालपे यांनी विना परवानगी त्यांच्या जागेवर एका । कंपनीचे मोबाईल टॉवर उभारले ! होते. स्थानीक नागरिकांना टॉवरचा त्रास होत असल्यामुळे त्यांनी मनपात तक्रार केली होती. त्यामुळेमनपाच्या अधिकाऱ्यांनी मालपे यांना स्वतः टॉवर काढण्याचे आदेश दिले. अन्यथा मनपा अतिक्रमण विभाग टॉवर काढून टाकेल असे सुध्दा सांगीतले होते. तरीसुध्दा मालपेने टावर काढले नाही. त्यामुळे मंगळवारी दुपारी अतिक्रमण विभागाचे पथकप्रमुख श्याम चावरे (वय ५३) कर्मचाऱ्यांसह मालपेच्या घरी नोटीस बजावण्याकरिता गेले असता त्याने कर्मचाऱ्यांच्य अंगावर नालीतले पाणी फेकले तसेच जीवाने मारून टाकण्याची धमकी दिल्याचे कर्मचाऱ्यांनी पोलीस ठाण्यात नोंदविलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेत दिघी महल्ले जिल्हा परिषद शाळा प्रथम तर तळेगाव मुलींची शाळा द्वितीय

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना स्पर्धेचा ; मुल्यांकन अहवाल जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६धा.रेल्वे**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत पाककृती स्पर्धेत दिघी महल्ले जिल्हा परिषद शाळा प्रथम तर तळेगाव येथील जिल्हा परिषद मुलींची शाळा द्वितीय क्रमांकची मानकरी ठरली असून तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा वरूड बगाजी शाळेने पटकाविले.याबद्दल या शाळेचे अभिनंदन होत आहे.



सध्याच्या बदलत्या जीवनपद्धती आणि फास्ट फूडच्या काळात मानवाच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम पडताना दिसतोय. त्याच बरोबर या काळात हेल्दी तृणधान्य पिकाचं आहारात महत्त्वही कमी दिसतं.नवी पिढी तृणधान्याचं महत्त्वही जाणत नाही. मात्र तृणधान्य हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायक आहे. त्याचा आहारात समावेश व्हावा म्हणून त्याच्या वेगवेगळ्या पदार्थांची स्पर्धा भरवण्यात आली होती.यामध्ये शाळेत आहार शिजवणाऱ्या महिलांनी सहभाग घेतला. यामध्ये तृणधान्यापासून बनलेले एक ना अनेक हेल्दी पदार्थ बघायला मिळाले.पंचायत समिती धामणगाव रेल्वे अंतर्गत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेचा मुल्यांकन अहवाल जाहीर करण्यात आला आला.यात प्रथम क्रमांक जिल्हा परिषद पूर्व माध्यमि शाळा दिघी महल्ले,द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा तळेगाव दशासरने तर तृतीय क्रमांक जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा वरूड बगाजीने प्राप्त केला.मंगरुळ समूह साधन केंद्रांचे केंद्र प्रमुख डी.एस.राठोड,दिघी महल्ले शाळेचे मुख्याध्यापक अशोक खंडारे,पदवीधर शिक्षक प्रशांत अजमिरे,विषय शिक्षिका रश्मी कासदेकर,विजय आडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या स्वयंपाकी व मदतनीस रूपाली चौधरी,कमला अमझरे यांनी पाक कृती बनविली होती.आपला दैनंदिन आहार कर्बोदके, प्रथिने आणि जीवनसत्त्वांनी समृद्ध असणे आवश्यक आहे. सदरच्या सर्व गरजा तृणधान्यामधून भागविणे शक्य आहे. यासाठी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत बनवलेल्या पदार्थांची पाककृती स्पर्धा घेण्यात आली.

# जळगाव आर्वीत भारुडाने समाज जागृती

## संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सव : ग्रामस्थांना पोट धरून हसविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६धा.रेल्वे**

सत्वर पाव ग मला!
भवानी आई रोडगा वाहीन
तुला!!

अशा एकापेक्षा एक संत एकनाथ महाराजांच्या ओवीने समाज जागृती करीत भाररुडाने ग्रामस्थाला पोट धरून हसविले. तालुक्यातील जळगाव आर्वी येथे सुरू असलेल्या संत लहरी बाबा पुण्यातिथी महोत्सवाच्या पहिल्या सत्रात रोशन महाराज धोंडगे, हेमंत महाराज तावडे,अर्जुन महाराज शेळके यांनी नावाचे महत्त्व,अहंकार , विनोदाच्या या माध्यमातून आध्यात्मिक बाबी व्यसनमुक्तीच्या संदेश दिला. पूर्वी पती-पत्नीत एक विश्वास होता जेवढे मोठे पत्नीच्या डोक्यावर कुंकू तेवढे पतीला



आयुष्य असे म्हटले जात होते. आता कुंकवाची टिकली झाली आणि एका महिन्यात घटस्फोटाचे प्रकार वाढले आहे एकमेकाविषयी विश्वास नावाचा शब्द दिसत नाही. आजचे तरुण स्वयंरोजगार,रोजगार मिळेल यामागे न लागता मुलीच्या मागे बोंबलत फिरतात कर्तुत्वाने आयुष्य घडवा आपल्या जन्मदात्याचे नाव मोठे करा .असा संदेश त्यांनी आपल्या भारुडातून तरुणांना दिला.आजच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे.मात्र संस्कृती लोपपावता कामा नये त्याची दखल घेणे गरजेचे असल्याचेही भारुडातून सांगितले धार्मिक व वैयक्तिक तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचण्यासाठी नाट्यप्रयोगातून त्यांनी श्रोत्यांना खळखळून हसविले.

या संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सवात केशव महाराज,विलास कोरडे महाराज,अनील महाराज साखरे,स्वाधी सर्वेश्वरी दीदी,विशाल महाराज बढे यांचे दररोज रात्री कीर्तन होत आहे.

# कारला थांबवून तोडफोड करणाऱ्या चौघांना अटक : कट लागल्याच्या कारणावरून कार फोडल्याची कबूली : दर्यापुर पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६दर्यापूर**

मुलीच्या लग्नाची बैठक आटोपून अकोलासाठी निघालेल्या कारला वाटेत अडवून अज्ञात दुचाकीस्वारांनी कारची तोडफोड केली होती. याबाबत दर्यापुर पोलिसांनी युध्दपातळीवर बोधमोहिम राबवून कार फोडणाऱ्या बौघांना अटक केली. कार चालक कट मारून पळून गेल्याने कार कोडल्याची कबूली आरोपींनी लिसांना दिली.



प्रेम पुण्या भोसले २५), जाकी पुण्या भोसले (२०), तिक चंदु पवार (२३), एका ल्पवयीन सर्व रा. टोलंगाबाद शी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

प्राप्तमाहितीनुसार, तक्रारकर्ते मिलिंद रंगराव देशमुख (५४) रा. म्हैसांग ३ मार्च रोजी इतर नातेवाईकांसह त्यांच्या एमएच-१४-एलए-१८०७ क्रमांकाच्या कारने दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथे मुलाच्या घरी आयोजित त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या बैठकीसाठी गेले होते. बैठकीनंतर मिलिंद देशमुख हे परत जात असताना त्यांची कार दर्यापूर-अकोला मार्गावर टोंगलाबाद जवळ आली असता रस्त्यावर दोन दे दुचाकीजवळ उभ्या असलेल्या चार मुलांनी मदतीचा हात देऊन देशमुख यांची कार थांबविली आणि दुचाकीला कट मारल्याबाबत त्यांच्याशी वाद घातला. तसेच आरोपींनी कारची तोडफोड करून सुमारे ३० हजार रूपयांचे नुकसान केले. याबाबत गुन्हा दाखल होताच दर्यापुर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून वरील नमूद चारही आरोपींना अटक केली.

# दर्यापुरातील ५,२९३ लाभार्थींच्या पेंशनला अखेर कात्री लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६दर्यापूर**

संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थींना आता आधार व मोबाईल नंबर प्रमाणीकरण (व्हेरीफिकेशन) बंधनकारक करण्यात आले आहे. परिणामी राज्य सरकारने जानेवारी, फेब्रुवारी व पुढील अनुदान अशा प्रमाणीकरण केलेल्या लाभार्थींना देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फटका आधार प्रमाणीकरण नसलेल्या दर्यापूर तालुक्यातील ५ हजार २९३ लाभार्थींना बसणार आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजना या दोन्ही योजनेतील लाभार्थींना आधार प्रमाणीकरण करण्यासाठी मागील वर्षभरापासून मुदत देण्यात येत होती. निवडणुकांच्या काळात आधार प्रमाणीकरणाचा अट न घालता सरकारने सर्वच लाभार्थींना लाभ दिला. मात्र, आता दोन्ही योजनांसाठीचे निकष अधिक कठोरपणे राबवण्याचे शासनाने ठरविले आहे. सरकारने जानेवारी २०२५ पासूनचे अर्थसाहाय्य आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थींना देण्याचा निर्णय घेतला आहे.

# सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये अमरावती महापालिका राज्यात सातव्या क्रमांकावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन आणि माहिती प्रणाली अहवालानुसार महापालिकांमध्ये अमरावती महापालिकेने सातवा क्रमांक पटकावला आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांनी हा अहवाल प्रसिद्ध केला असून या अहवालात १ एप्रिल २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच्या आकडेवारीचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये महापालिकेचे १२ आणि ४ आपला दवाखाना कार्यान्वित आहे. चार पैकी तीन दवाखाने हे जिल्हाशल्यचिकित्सकांकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. १५ व्या वित्त आयोगातून नवीन१७ पैकी ११ दवाखाने कार्यान्वित आहेत. सहा ठिकाणी विरोध झाल्यामुळे ते दवाखाने इतरत्र हलविण्यात आले. जिल्हा नियोजनच्या सभेमध्ये औषधांचे स्टोअर रुक्मिणीनगरमध्ये अशा सेविकांकरिता ट्रेनिंग हॉल तसेच पॉलिक्लिनिकमध्ये मशिनरी करण्याच्या उपलब्ध मागणीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.



महापालिकेच्या दवाखान्यांमधून सार्वजनिक आरोग्याच्या विविध निकषांवर, विशेषतः कुटुंब कल्याण, मातृ व बाल संगोपन, तसेच नियमित लसीकरण कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेने यश संपादन केले आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाने प्रसारित केलेल्या जानेवारी २०२५ च्या अहवालानुसार महापालिकेने ३९.१२ गुण मिळविले आहेत.

**सार्वजनिक आरोग्य सेवांमधील उत्तुंग कामगिरी**

महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी अनेक प्रभावी उपक्रम राबवले आहेत. यामध्ये मातृ व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत गरोदर माता नोंदणी, १२ आठवड्यांपूर्वी प्रसूतीपूर्व नोंदणी, गरोदर मातांचे लसीकरण आणि आयएफए गोळ्यांचे वितरण यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. तसेच बाल आरोग्य सेवांच्या अंतर्गत नवजात बालकांची नोंदणी प्रभावीपणे झाली आहे. नियमित लसीकरण, कुटुंब नियोजन कार्यक्रम, कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांचे नियोजन, तसेच पीपीआययूसीडी बसवण्याचे प्रमाण वाढवण्यावर भर, गरोदर महिलांसाठी उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा पुरवण्यावर भर देणे, या सारख्या विविध उपक्रमांचाही यामध्ये समावेश आहे.

# उद्या ७ व ८ मार्चला पोषण कामगार शाळेत शिजवणार नाहीत आहार

## पोषण आहार कामगार संघटनेचे आंदोलन : रखडलेले वाढीव मानधन व इतर मागण्यांसाठी कामगारांचा मुंबईत मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ धा.रेल्वे**



प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात ७ व ८ मार्च रोजी या कामगारांनी दोन दिवशीय संप पुकारलेला आहे.त्यामुळे राज्यातील शाळेतील शालेय पोषण आहार शिजविणार नाही.दरम्यान ७ व ८ मार्चला मोर्चा काढण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत स्वयंपाकी व मदतनीस १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेत मध्यान्ह भोजन शिजवण्याचे काम अत्यंत अल्पशा २५०० रुपये मानधनावर म्हणजे ८३ रुपये रोजाने मागील कित्येक वर्षापासून करतात.केंद्र सरकारने तर २०१८पासून एक रुपयांची सुद्धा मानधनात वाढ केली नाही. दैनंदिन आहार शिजवण्याचे काम करीत असताना इंधना पासून तर भाजीपाला आणि धान्याच्या दर्जा पर्यंत अनेक समस्यांना कामगारांना तोंड द्यावे लागत आहे.१ हजार रुपयांची वाढ त्वरित केली पाहिजे व यासह कामगारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात ७ व ८ मार्च रोजी या कामगारांनी दोन दिवशीय संप पुकारलेला आहे.त्यामुळे राज्यातील शाळेतील शालेय पोषण आहार शिजविणार नाही.दरम्यान ७ व ८ मार्चला मोर्चा काढण्यात येणार आहे.



आहार शिजवताना दुर्घटना घडली,तर आम्हाला विम्याचे संरक्षण नाही. कमी पगारात झाडून घेण्यापासून स्वच्छतागृह स्वच्छ करण्याचे काम करावे लागते.तुटपुंज्या पगारावर काम करावे लागते. त्यामुळे केंद्र सरकारच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे १५ हजार रुपये किमान वेतन मिळावे, शासन नियमाप्रमाणे शासकीय सेवेत सामावून घ्यावे, इतर केडरप्रमाणे स्वयंपाकी व मदतनीस यांना विमा संरक्षण द्यावे, गणवेश मिळावा.

**संगीता चौधरी**
**पोषण आहार कामगार संघटना धामणगाव रेल्वे**

### पंचायत समितीला दिले निवेदन

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत स्वयंपाकी व मदतनीस यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन पंचायत समितीला दिले.यावेळी जुना धामणगाव येथील संगीता चौधरी,पदमा नेवारे,वनिता शेलार,माला बेलसरे,सुमित्रा पडोळे,उमा शेंद्रे,सुनीता सोणवने,सुनीता व्यवहारे व आदी उपस्थित होते.

# किरीट सोमय्या यांनी गाडगेनगर पोलिसांना दिले ४६८ पानाचे पुरावे

## जिल्हाधिकारी सौरभ कटीयार विरोधात केंद्र सरकारकडे तक्रार बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट जन्म दाखले दिल्याच प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**




अमरावती महानगरपालिका क्षेत्रात ४हजार ५०० बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट कागदपत्राच्या आधारे प्रशासनाने जन्मदाखले दिल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला.. आतापर्यंत सहा लोकांवर मनावर कागदपत्र दिल्याचा आरोप करत गुन्हे दाखल केले आहे, दरम्यान आज किरीट सोमय्या यांनी अमरावतीच्या गाडगे नगर पोलीस स्टेशनमध्ये जात पोलीस निरीक्षक व पोलीस उपायुक्त यांची भेट घेत त्यांच्यासोबत चर्चा केली,

सोमय्या यांनी ४६८ पानाचे पुरावे मी पोलिसांना दिले, यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया दिली, ५० लोकांनी जन्म दाखल्यांसाठी कुठलाही पुरावा दिला नाही. तर आज पोलिसांनी माझ बयान नोंदवल आहे तर अमरावती जिल्हाधिकारी सौरभ कटीयार विरोधात केंद्र सरकारकडे तक्रार केली आहे, जिल्हाधिकाऱ्याचे लक्षात महिनाभरापुढे आणून दिलं तरी देखील त्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला.अमरावती जिल्ह्यात पाच ठिकाणी नायब तहसीलदार यांनी सुनावणा केल्या ते आदेश बेकायदेशीर आहे.अमरावती शहरात साडे चार हजार जन्मदाखले बोगस आहे ते ताबडतोब रद्द करा व सर्वांवर गुन्हे दाखल करा अशी मागणी त्यांनी केली.

# होळीच्या शुभ पर्वावर राणा दाम्पत्य यंदाही मेळघाटात साजरी करणार होळी

## १३ मार्च ते १७ मार्च पर्यंत देणार विविध गावांना भेटी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

आदिवासींच्या मुख्य सण असणाऱ्या होळीच्या पावन पर्वावर आदिवासींचा उत्सार वाढविण्यासाठी व आदिवासी व संस्कृती परंपरा जोपासण्यासाठी दरवर्षी आ.रवि राणा व भाजपा स्टार प्रचारक तथा हिंदु शेरणी मा.खा.नवनित रवि राणा हे होळीचा सन घरी साजरा न करता मेळघाटातील आदिवासी बांधवांसोबत साजरा करतात व त्यांच्या उत्साहात व आनंदात सहभागी होतात यावर्षी सुद्धा दि.१३ मार्च ते १७ मार्च पर्यंत होळीच्या शुभ पर्वावार आदिवासी बांधवांसोबत होळी साजरी करणार आहे. तसेच मेळघाटातील दुर्गम गावामध्ये जावुन त्या ठिकाणच्या आदिवासींना भेटुन आदिवासींच्या समस्या सुद्धा जाणून घेणार आहे. विशेष म्हणजे मेळघाटातील सर्व आदिवासी भाजपा स्टार प्रचारक तथा हिंदु शेरणी मा.खा.नवनित रवि राणा यांना मेळघाटची बेटी म्हणूनच संबोधतात. या दौऱ्यामध्ये धारणी, कुसुमकोट, कळमखार, गौलखेडा, नागोढाणा, दाबिदा, अंबाडी, रोहीणीखेडा, बोगदा, सलाई, खारी इ. अनेक गावांचा समावेश या दौऱ्यामध्ये आहे. आदिवासी बंधु भगिनींसोबत होळीचा आनंद घेण्यात वेगळाच आनंद मिळतो अशा प्रकारचे मनोगत आ.रवि राणा व भाजपा स्टार प्रचारक तथा हिंदु शेरणी मा.खा.नवनित रवि राणा हे व्यक्त करित असतात. आदिवासी बंधु भगिनींच्या तर्फे आतापर्यंत खुप आशीर्वाद रुपी प्रेम मिळाल्याचे राणा दाम्पत्य यांनी सांगितले.

# चांदूर बाजार मध्ये दहावीचा पेपर फुटला, पोलिसांनी गैरप्रकार समोर आणला

## परीक्षा मंडळाचे सर्व दावे फोल, कॉपी मुक्त अभियानाचा फज्जा : प्रकरणी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ चांदूर बाजार**

चांदुर बाजार येथील जिजामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या परीक्षा केंद्राच्या परिसरात असलेल्या सागर झेरॉक्स सेंटर मधून दिनांक ५ मार्च रोजी झालेल्या गणिताच्या पपेरची प्रश्न पत्रिका बाहेर येताच उत्तरपत्रिकांच्या प्रिंट काढून विधार्थ्यांना पुरवल्या जात असल्याचा धक्कायक प्रकार समोर आला असून या प्रकरणी आरोपी शहेजाद खान शमशेर खान वय ५० वर्ष रा. धर्माळपुरा, चांदुर बाजार यांच्या विरूध्द कलम २२३ भा. न्या. स. सहकलम ०७ महाराष्ट विद्यापीठाच्या, मंडळाच्या व ईतर विनिर्दिष्ट परिक्षामध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२ प्रमाणे चांदूर बाजार पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

दिनांक ५ मार्च २०२५ रोजी पोहेकॉ दिनेश राठोड व गणेश



### परीक्षा केंद्राच्या आत १०० मी. अंतरावर उत्तरपत्रिकेची झेरॉक्स

चांदूर बाजार येथील गणिताचा पेपर फुटला सकाळी ११ वाजता गणिताचा पेपर सुरू झाल्यानंतर काही वेळातच जिजामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या परीक्षा केंद्रांच्या १०० मी अंतरावर उत्तर पत्रिकाची झेरॉक्स मिळत होती परंतु प्रश्नपत्रिका बाहेर आली कशी याची चर्चा आता संतप्त पालक करित आहे.

आगोले ठाणेदार संतोष टाले यांच्या आदेशाने ईयता १० वी चा गणिताचा पेपर असल्याने चांदूर बाजार येथील शाळा महाविद्यालय परिसरात गोपणीय माहिती काढणे व गस्त करिता गेले होते त्यांना गुप्त बातमीदारा कडुन विश्वनिय माहिती मिळाली की जिजामाता विद्यालयाच्या परीक्षा केंद्रा समोर असलेल्या एका झेरॉक्स दुकानांमध्ये मध्ये १० वीच्या गणिताच्या पेपरची उत्तर पत्रीकेची काही मुले झेरॉक्स काढुन घेवुन जात आहे व दुकानदार सुध्दा झेरॉक्स काढुन कॉपी पुरवण्यात सहकार्य करत आहे अशी गोपणीय माहिती पोलिसांना मिळाली असताच पोहेकॉ दिनेश राठोड व गणेश आगोले यांनी पाहणी केली व झेरॉक्स सेंटरवर मोठ्या प्रमाणात गर्दी दिसली व त्याठिकाणी असलेले तरुण पोलिसांना पाहून पसार झाले झेरॉक्स सेंटरची पोलिसांनी पाहणी केली असता इयत्ता १० वी च्या गणिताच्या पेपरची प्रश्न पत्रिकाचे उत्तराची नक्कल असलेली झेरॉक्स पान क्र. १ वर प्रश्न क. Q2- iii), Q 3 - ii), ७८ पान क. २ वर Q2 Bi), Q2 B iii), Q 2 B ii), Q 3 Bi), Q2 B ii) या प्रश्नाची उत्तरे असल्याचे कागद पोलिसांना मिळून आले गणिताच्या पेपरची प्रश्न पत्रिकाचे उत्तराची नक्कल प्रति जप्त केले व जिजामाता विद्यालया पासुन झेरॉक्स दुकानांचे अंतर हे १०० मीटरच्या आत असुन प्राचार्य जिजामाता विद्यालय, चांदुर बाजार यांनी त्यांना परिक्षा दरम्याण झेरॉक्स दुकान बंद करण्याबाबत आदेश व नोटीस देवुन सुध्दा दुकान चालु ठेवुन आदेशाची अवहेलना करून पेपरच्या उत्तराची झेरॉक्स काढुन कॉपी करीता अनुचीत मार्गाचा अवलंब केला असल्याची माहिती पोलसांनी दिली व पुढील तपास सुरू आहे या पुढे अशे गैरप्रकार घडू नये या साठी शासनाने उपाययोजना राबविल्या पाहिजे.

### परीक्षा मंडळाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी केलेल्या तयारीचा फज्जा

परीक्षा मंडळाच्या वतीने कॉपी मुक्त परीक्षासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले परंतु हा धक्कादायक प्रकार समोर आल्याने परीक्षा मंडळाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी केलेल्या जय्यत तयारीचा फज्जा उडल्याचे समोर आले आहे यासह प्रश्न पत्रिका बाहेर कशी आली व कोणाच्या माध्यमातून आली व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून कुठ पर्यंत पोहचली त्याची चौकशी पोलिसांना आता करावी लागणार आहे.

# मजुरांचे २०० कोटींचे पेमेंट होणार केव्हा? निधीच उपलब्ध नाही

## 'मनरेगा'ची दोन हजारांवर कामे सुरू : २९७ रुपये रोजाप्रमाणे १०० दिवस कामांची हमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

गावपातळीवर मजुरांना गावातच काम उपलब्ध व्हावे, यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात दोन हजारांवर कामे सुरू आहेत. यामध्ये डिसेंबर २०२४ पासून आतापर्यंत अकुशल कामाचे ७२.७९ कोटी, तर दोन वर्षांपासून कुशल कामांचे १२६.६३ कोटी असे २०० कोटी रुपयांचे पेमेंट झालेले नाही. त्यामुळे कामगार अडचणीत आले आहे.

केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे जॉबधारक मजुरांना प्रतिदिन २९७ रुपये याप्रमाणे १०० दिवस काम दिल्या जाते. या १०० दिवसांनंतरच्या कामाची मजुरी ही राज्य शासनाद्वारा दिले जाते. यामध्ये केंद्र शासनाद्वारा जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांचे पेमेंट मजुरांना मिळाले आहे. मात्र, राज्य शासनाद्वारा १०० दिवसांवरचे पेमेंट रखडले आहे. त्यामुळे हातावर खाने असलेल्या मजुरांवर उपासमारीची पाळी आलेली आहे.

### अकुशल कामांची मजुरी प्रलंबित

अचलपूर तालुक्यात २.३५ कोटी, अमरावती १.१३ कोटी, अंजनगाव सुर्जी ३१.२९ लाख, भातकुली ५१ लाख, चांदूर रेल्वे ६७.९५ लाख, चांदूर बाजार १.४ कोटी, चिखलदरा ४५.५९ कोटी, दर्यापूर ४५.५१ लाख, धामणगाव ६१.१८ लाख, धारणी ९.३३ कोटी, मोर्शी ६.६७ कोटी, नांदगाव खंडेश्वर १.३७ कोटी, तिवसा ५.१५ कोटी, तर वरुड १.३६ कोटी

### 'मनरेगा' द्वारे ही कामे प्रगतीत

मनरेगा योजनेद्वारे अकुशल कामांचा निधी, तर रखडला आहे. शिवाय कुशल कामांच्या बिलाचे १२६.६३ कोटी मिळाले नाहीत. यातील काही निधी दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित आहे.



# शाळा एप्रिलअखेरपर्यंत, परीक्षेच्या वेळापत्रकावर आक्षेप : विदर्भात तापत्या उन्हात परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी २चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) जाहीर केले आहेत्यानुसार ८ ते २५ एप्रिल या कालावधीत ही चाचणी होणार आहे. त्यामुळे राज्य मंडळाच्या सर्वच शाळांतील परीक्षा एकाच वेळी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, परीक्षा एप्रिलअखेरीस होणार असल्याने या वेळापत्रकावर आक्षेप घेण्यात आला असून, इतक्या उशिरा परीक्षा झाल्यास १ मे रोजी निकाल जाहीर कसा करणार, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातून उपस्थित करण्यात येत आहे.विदर्भा उन्हाचा पारा ४५अंशावर जातो.या तपत्या उन्हात टिनाच्या पऱ्याच्या वर्ग खोल्या यात एप्रिल महीण्यात परीक्षा ही बालकांच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार आहे.परीक्षा एप्रिलच्या पहील्या आठवड्यात घेण्याची मागणी आहे,

एससीईआरटीने दिलेल्या सूचनांनुसार शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खासगी अनुदानित शाळांना नियतकालिक मूल्यमापन चाचणीअंतर्गत तिसरी ते नववीसाठी प्रथम




भाषा, गणित आणि तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी २च्या प्रश्नपत्रिका पुरवण्यात येतील. इतर व्यवस्थापनाच्या शाळांनी सर्व प्रश्नपत्रिका शाळास्तरावर तयार करायच्या आहेत. पहिली ते दुसरीसाठी सर्व विषयांच्या आणि तिसरी ते नववीच्या अन्य विषयांच्या संकलित चाचणी २ लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका विषयांच्या संकोलेत चाचणी २ लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका शाळास्तरावर विकसित करून प्रचलित पद्धतीने मूल्यमापन करावे. नववीसाठी नियतकालिक मूल्यमापन चाचणीशिवाय अन्य विषयांचे वेळापत्रक शाळास्तरावर ठरवण्यात यावे. पाचवी आणि आठवीच्या वार्षिक परीक्षांसाठी शाळांनी सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षा घ्यायची आहे. नियतकालिक मूल्यमापन चाचणी ३ अंतर्गत दिलेल्या प्रश्नपत्रिका वार्षिक परीक्षा म्हणून वापरता येणार नाहीत. पाचवी आणि आठवीवगळता अन्य कोणत्याही इयत्तांसाठी दुबार परीक्षा होणार नाही. तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा त्या त्या दिवशी लेखी परीक्षेनंतर घ्यावी. संकलित चाचणी २मध्ये परीक्षेच्या दिवशी विद्यार्थी गैरहजर असल्यास तो शाळेत हजर झालेल्या दिवशी परीक्षा घ्यावी. राज्यातील सर्व माध्यमांच्या झालेल्या दिवशी परीक्षा घ्यावी. राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचा निकाल महाराष्ट्र दिनी (१ मे) ध्वजारोहणानंतर जाहीर करावा, २ मेपासून शाळांना उन्हाळी सुटी सुरू होईल. या सूचना राज्य मंडळाव्यतिरिक्त शाळांना लागू असणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.